# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१९

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### जागतिक बँकेने प्रसिध्द केलेल्या अहवालानुसार समुद्रकिनारी असलेल्या शहरातील नागरिकांना धोका असल्याबाबत

**(१) ५८०३२ (२८-०७-२०१६). श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जागतिक पर्यावरण अहवाल विभागीय मुल्यांकन या अहवालात येत्या काही वर्षात समुद्र किनाऱ्यावर राहणाऱ्या ४ कोटी भारतीयांना धोका असून मुंबई शहर पाण्याखाली जाणार असल्याचा इशारा दिला असल्याचे दिनांक २१ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वाढते नागरीकरण व सामाजिक आर्थिक परिस्थितीचा मोठा परिणाम वातावरणावर होत आहे, निसर्गाची अपरिमित हानी होत आहे, त्याचा परिणाम किनारपट्टीवरील निसर्गावर होत असल्याने सदर धोका उद्भवणार असल्याचे म्हटले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, खबरदारीची उपाययोजना म्हणून शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (२५-०३-२०१९) :** (१) व (२) जागतीक बँकेकडून जून,२०१३ मध्ये प्रसिद्ध झालेल्या अहवालात दक्षिण पुर्व आशियामधील समुद्रकिनारी असलेल्या शहरातील समुद्राची पातळी वाढणार असल्याचे नमुद आहे. तसेच नासाकडून ३१ ऑगस्ट, २०१६ रोजी प्रसिद्ध झालेल्या वृत्तानूसार देखील निदर्शनास आलेले आहे.
(३) जागतीक स्तरावर औद्योगीकरण, वाढती लोकसंख्या, बेसूमार जंगलतोड, नैसर्गीक व मानवनिर्मित घडामोडींमुळे वातावरणातील कार्बनडाय ऑक्साईड नायट्रोजन व मिथेन इत्यादी यासारख्या हरित वायूंचे प्रमाण नैसर्गीक प्रमाणापेक्षा अधिक वाढल्यामुळे पृथ्वीच्या तापमानात सन १९८० पासून सरासरी ०.८ अंश सेल्सिअस इतकी वाढ झाल्याने वातावरणात बदल होत

आहेत. या वातावरणीय बदलांमुळे जागतीक स्तरावर समुद्राच्या पातळीत सुद्धा सरासरी २३ से.मी इतकी वाढ झालेली आहे. महाराष्ट्र राज्याने माहे मार्च २०१० मध्ये टेरो या संस्थेच्या सहकार्याने अशा बदलांमुळे उद्भवणाऱ्या समस्यांना सामोरे जाण्यासाठी सविस्तर कृती आराखडा तयार करण्याचे काम हाती घेतले होते. केंद्र शासनाने सन २००८ मध्ये वातावरणीय बदलांना सामोरे जाण्यासाठी रास्ट्रीय वातावरणीय बदल कृती आराखडा तयार करून त्या अनुरूप सर्व राज्यांना कृती आराखडा करण्याचे निर्देश दिले होते. उपरोक्त संस्थेने विभागनिहाय केलेल्या शिफारशीच्या अनुषंगाने राज्याचे वातावरणीय बदलांचे परिणाम कमी करण्यासाठीच्या उपाययोजना बाबत दि.२४ ऑक्टोंबर, २०१७ च्या शासन निर्णयान्वये व्यापक धोरण ठरविण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई उपनगर जिल्ह्याच्या लोकसंख्येच्या दृष्टीकोनातून नागरी वस्त्यांमधील रोगराई नियंत्रणात आणण्याबाबत

**(२) ५९४०७ (२८-०७-२०१६). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मुंबई उपनगर जिल्ह्याच्या लोकसंख्येच्या दृष्टीकोनातून नागरी वस्तीत पसरलेले अनारोग्य नियंत्रणात आणण्याबाबतची मागणी स्थानिक रहिवाशी संघटना, लोकप्रतिनिधी तसेच स्थानीय रहिवाशी संघाच्या प्रतिनिधींनी मा.पर्यावरण मंत्री, मा.पर्यावरण राज्यमंत्री, प्रधान सचिव, पर्यावरण विभाग यांच्याकडे दिनांक २३ एप्रिल, २०१६ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (२७-०३-२०१९) :** (१) व (२) अशा प्रकारचे निवेदन प्राप्त झाल्याचे अभिलेखावर आढळून येत नाही. तथापि नागरी वस्तीत आरोग्यवर्धनाकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून पुढील प्रमाणे उपाययोजना करण्यात आल्या आहेत:-

अ) साथीच्या आजारासाठी नियंत्रण कक्षाची स्थापना, रोगसर्वेक्षण, रोगनिदान, सुविधा, पुरेशी औषध सामुग्री, प्रशिक्षण, जनजागृती

ब) मलेरिया आजाराच्या नियंत्रणासाठी राबविण्यात येणारे कार्यक्रम:-

- डास प्रतिबंध उपाययोजना
- त्वरित निदान व समूळ उपचार
- मायक्रोमॅपिंग आणि मायक्रोप्लॅनिंग
- मनपाच्या व इतर खात्यांशी समन्वय
- प्रशिक्षण व जनजागृती

क) डेंग्यू आजाराच्या नियंत्रण व प्रतिबंधासाठी राबविण्यात येणारे कार्यक्रम:-

- हाऊसिंग सोसायटीज व कामाच्या ठिकाणी विशेष उपाययोजना
- सहवासिताचे सर्वेक्षण
- खाजगी वैद्यकीय व्यवसायीकाबरोबर समन्वय
- उच्चभ्रु वस्तीत विशेष उपाययोजना
- जनजागृती

ड) किटक नियंत्रण विभागातर्फे राबविण्यात येणारे कार्यक्रम

- महापालिकेतर्फे स्कंधविराजीत धुम्रफवारणी यंत्राद्वारे व परिमंडळ निहाय ७ वाहन विराजीत धुम्रफवारणी यंत्राद्वारे धुम्रफवारणी करण्यात येते
- बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात बांधकामाच्या ठिकाणी कार्यरत बांधकाम मजुरांच्या झोपडयामध्ये इनडोअर रेसीडयुअल फवारणी (IRS) करण्यात येते.
- महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये झोपडपटी विभागात ड्रममध्ये भरुन ठेवलेल्या पाण्यात टेमीफॉस हे डास अळीनाशक टाकण्यात साप्ताहिक आवर्तनाने येते.
- त्याच प्रमाणे इतर डास उत्पतीस्थानावर डास अळीनाशक तेलाची फवारणी करण्यात येते.
- डेंग्यू डासांची उत्पत्ती रोखण्यासाठी मे २०१६ पासून झोपडपट्टयांच्या छपरांवरील टायर व ऑड आर्टीकल काढण्याचे विशेष कार्यक्रम हाती घेण्यात आले आहे.
- मलेरिया व डेंग्यू पसरविणा-या डासांची उत्पत्ती झाल्याचे आढळले अशा रहिवाश्यांना मनपा अधिनियम १८८८ कलम ३८१ (अ) (ब) द्वारे कायदेशीर करण्यात येते.

इ) लेप्टोस्पायरोसिस या आजाराच्या नियंत्रण व प्रतिबंध करण्यासाठी गोठे व तबेले यांच्यावर कारवाई करण्यात येते.

ई) जलजन्य आजारासाठी करण्यात येणा-या उपाययोजना

- २४ विभागातील वैद्यकीय आरोग्य अधिका-यांच्या कार्यालयामार्फत पिण्याच्या पाण्याचे दैनंदिन सर्वेक्षण करण्यात येते.
- अयोग्य पाण्याचा नमुना आढळलेल्या व जलजन्य आजाराच्या रुग्ण आढळलेल्या परिसराचे सर्वेक्षण करण्यात येते.
- सर्वेक्षण आढळलेल्या रुग्णांमध्ये शुष्कीकरण टाळण्याकरिता जलसंजिवनीचे वाटप करण्यात येते.
- आवश्यकतेनुसार रुग्णांना जवळच्या दवाखाना/ रुग्णालयात पुढील उपचारासाठी संदर्भित करण्यात येते.
- पाणी उकळून व गाळून पिण्याबाबत जनजागृती करण्यात येते.
- पाण्याच्या अतिरिक्त शुध्दीकरण्यासाठी क्लोरिन गोळयांचे वाटप करण्यात येते.
- कनिष्ठ अन्वेषक (अन्ननाशक) यांच्यामार्फत विभागातील पदपथावरील उघडे अन्नपदार्थ, जास्त पिकलेली फळे, धूळ व माश्या बसलेले अन्नपदार्थ व सरबतासारखी पेये नष्ट करण्यात येतात.
- मुंबई महानगरपालिका सार्वजनिक आरोग्य खात्यातर्फे फेरिवाल्याकडील पाणी व बर्फे नमुने तपासण्यासाठी विशेष मोहिम राबविण्यात येत असून अयोग्य नमुना आढळलेल्या आस्थापनावर कारवाई करण्यात येते.

फ) एच १ एन १ (स्वाईन फ्ल्यू) आजाराच्या प्रतिबंधासाठी गरोदर माता, आरोग्य कर्मचारी व अतिजोखमीच्या गटासाठी ४५ लसीकरण केंद्रावर एच १ एन १ (स्वाईन फ्ल्यू) लसीकरण सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर शहरातील बेगमपेठ आणि रंगराज नगर येथे**
**पोलिसांनी गुटखा जप्त केल्याबाबत**

**(३) ६२१९८ (१६-०८-२०१६). श्री.सिध्दराम म्हेत्रे (अक्कलकोट), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर शहरातील बेगमपेठ आणि रंगराजनगर या ठिकाणी पोलिसांनी दिनांक १७ एप्रिल, २०१६ रोजी वा त्यासुमारास छापा टाकून सुमारे रुपये ५ लाख ६६ हजार किंमतीचा गुटखा जप्त करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (२६-०३-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) बेगम पेठ, सोलापूर व रंगराज नगर, सोलापूर येथे दिनांक १६/४/२०१६ रोजी एकत्रित रुपये ५,६६,८७०/- इतक्या किंमतीचा प्रतिबंधित अन्न पदार्थांचा साठा जप्त करण्यात आलेला आहे. त्यानुसार संबंधितांविरुध्द दिनांक १७/०२/२०१७ रोजी मा. मुख्य न्यायदंडाधिकारी, सोलापूर यांचे न्यायालयात खटला दाखल करण्यात आला आहे. प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील ध्वनी प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्याबाबत**

**(४) ६५०११ (१३-१०-२०१६). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरात सर्वाधिक ध्वनी प्रदूषण होत असल्याचे केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या (सिपीसिबी) अभ्यासातून स्पष्ट झाल्याचे दिनांक १६ फेब्रुवारी २०१६ रोजी वा सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास मुंबई, नवी मुंबईतील वाशी हॉस्पिटल, एएसीएचपी, वांद्रे आणि महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ मुख्यालयाच्या ठिकाणी बसविण्यात आलेल्या चार स्टेशन्समध्ये ध्वनी मर्यादेचे १०० टक्के उल्लंघन होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबईतील ध्वनी प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (०७-०३-२०१९) :** (१) हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
(३) महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडुन संबंधित महानगरपालिकेचे आयुक्त व पोलीस आयुक्त यांना दिनांक २७ जुलै, २०१६ रोजी निर्देश देण्यात आलेले आहेत. ध्वनी प्रदुषण (नियमन व नियंत्रण) नियम २०१७ चा प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी तसेच शांतता क्षेत्र /झोन घोषित करणेबाबत शासन निर्णय दिनांक २० नोव्हेबर, २०१७ अन्वये मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जिंदाल स्टील वर्क्स (जि.रायगड) या कारखान्याकडून पर्यावरणाची हानी होत असल्याबाबत**

**(५) ६६८६० (२७-०१-२०१७). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड जिल्ह्यातील मे.जिंदाल स्टील वर्क्स या कारखान्यामुळे पर्यावरणाची हानी झाल्या बाबत अनेक तक्रारी आल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) तसेच या कारखान्याविरुद्ध स्थानिक नागरिकांनी अनेकवेळा आंदोलने केली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (०८-०३-२०१९) :** (१) हे खरे नाही. रायगड जिल्यातील मे. जिंदाल स्टील वर्क्स या कारखान्यामुळे पर्यावरणाची हानी झाल्याबाबत उपप्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, रायगड व तहसिलदार पेण यांच्याकडे तक्रार प्राप्त झाली नाही.
(२) हे खरे नाही. रायगड जिल्यातील मे.जिंदाल स्टील वर्क्स या कारखान्याविरूध्द आंदोलनाबाबत उपप्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, रायगड व तहसिलदार पेण यांच्याकडे तक्रार प्राप्त झाली नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील सागरी किनाऱ्यावरील प्रदुषण रोखण्याबाबत**

**(६) ६७१२९ (२७-०१-२०१७). श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईच्या समुद्रात कोणतीही प्रक्रिया न करता सोडण्यात येणारे सांडपाणी, किनारपट्टीवर आढळणारा प्लॅस्टिकचा खच, तिवरांची होणारी बेसुमारे कत्तल इत्यादी अनेक घटक प्रदुषणाला कारणीभूत ठरत असल्याची बाब वॉच डॉग फाऊंडेशनने मुंबई महानगरपालिकेसह जिल्हाधिकारी व वन विभागाच्या अधिकाऱ्यांच्या सप्टेंबर, २०१६ रोजी निदर्शनास आणली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर "वॉच डॉग" संस्थेने मुंबईसह ठाणे आणि नवी मुंबईमधील खाडी आणि किनाऱ्यांच्या घेतलेल्या आढाव्यात वर्सोवा, गिरगाव चौपाटी, गेटवे ऑफ इंडिया, माहिम, वाशी खाडी, एलिफंटा बेट, वरळी सी फेस, नरिमन पॉईंट, हाजीअली आणि मुंब्रा रेतीबंदर येथील किनारे सर्वाधिक प्रदूषित झाल्याचे आढळून आले आहे, हे खरे आहे काय,
(३) तसेच देशातील प्रदूषणाचे प्रमाण अधिक असणा-या शहरांमध्ये नवी मुंबईचा समावेश झाला आहे व नवी मुंबईत विकासाच्या नावाखाली पर्यावरणाचा -हास होत असल्याने ही परिस्थिती निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार प्रदूषण रोखण्याच्या संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली आहे तसेच संबंधित पर्यावरण विभागाच्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (०८-०३-२०१९) :** (१) महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ व बृहन्मुंबई महानगर पालिका यांचे कडे वॉच डॉग फाऊंडेशनचा अहवाल प्राप्त झालेला नाही.
(२) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून गेट वे ऑफ इंडिया, नरिमन पॉईंट, गिरगाव, मलबार हिल, हाजी आली, वरळी, दादर, एलिफंन्टा केव्हस, माहिम क्रिक, वर्सोवा, जूहू चौपाटी, मिठी नदी (बिकेसी/एमटीएनएल ब्रिज) या ठिकाणाहून नियमीतपणे समुद्राच्या पाण्याचे नमुने संकलीत करण्यात येतात. समुद्राचे पाण्याचे पृथःकरण अहवालानुसार, पाण्याची गुणवत्ता बहुतांशी विहित मर्यादेत आढळते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर येथील प्रादेशिक प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या कार्यालयातील हेल्पलाईन बंद असल्याबाबत**

**(७) ७६६३७ (२०-०४-२०१७). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर पंचगंगा नदी प्रदुषणासंबंधी तक्रार करण्यासाठी आणि उपाय जाणून घेण्यासाठी येथील प्रादेशिक प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या कार्यालयातील हेल्पलाईन महामंडळाच्या दुर्लक्षित कारभारामुळे बंद असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त नदीतील प्रदूषित पाण्यामुळे जलचर मृत्यूमूखी पडत असून दूषित पाणी पिऊन नदीकाठावरील ग्रामस्थांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पंचगंगा नदी प्रदुषणाचा प्रश्न अनेक वर्षापासून प्रलंबित असून याबाबत शासनाने कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली व पंचगंगा नदी प्रदूषणमुक्त करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (०५-०३-२०१९) :** (१) हे खरे आहे.

पंचगंगा नदी प्रदूषण संदर्भात मा.उच्च न्यायालयात दाखल केलेल्या जनहित याचिका क्र.१८३/२०१२ च्या अनुषंगाने उच्च न्यायालयाने मंडळाच्या कोल्हापूर येथील कार्यालयात पंचगंगा नदी प्रदुषणाच्या तक्रारींची दखल घेण्यासाठी टोल फ्री दूरध्वनी देण्यात यावे. असे आदेशित दिले होते, त्यानुसार मा. विभागीय आयुक्त, पुणे यांच्या निर्देशानुसार सदर टोल फ्री हे पंचगंगा नदी प्रदूषणास कारणीभूत असलेले महत्वाचे घटक कोल्हापूर महानगरपालिका व इचलकरंजी नगरपालिका यांचे मार्फत दिनांक १३/०१/२०१५ पासून कार्यान्वित केले होते, त्याचा क्रमांक u १८००-२३३-१२१९ असा आहे. सदर टोल फ्री चे बिल कोल्हापूर महानगरपालिका व इचलकरंजी नगरपालिका यांनी विभागून भरावयाचे होते. तथापि, पाठपुरावा करुन देखील त्यांनी हे बिल न भरल्यामुळे बी.एस.एन.एल. यांच्याकडून सदर हेल्पलाईन बंद करण्यात आलेली आहे. याबाबत मंडळाने कोल्हापूर महानगरपालिका व इचलकरंजी नगरपालिका यांना सदर बिले भरण्यासंदर्भात कळविण्यात आले होते पुन्हा दिनांक २८/०२/२०१७ रोजीच्या पत्रान्वये देखील कळविले होते.

(२) अशतः खरे आहे, परंतु जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांच्या अहवालानुसार पंचगंगा नदीकाठाच्या कोणत्याही गावामध्ये जलजन्य आजाराची साथ उदभवलेली नाही.

(३) व (४) पंचगंगा नदीच्या प्रदूषणाबाबत करावयाच्या उपाययोजनांवर देखरेख व समन्वयासाठी मा.उच्च न्यायालयात दाखल झालेल्या जनहित याचिका क्र.१८३/२०१२ मध्ये मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशा प्रमाणे विभागीय आयुक्त, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली आदेश क्र.०८/२०१४ दि. २६.११.२०१४ अन्वये खालीलप्रमाणे समिती गठित करण्यात आलेली आहे. या समितीमध्ये निरी या संस्थेकडून सदस्य म्हणून डॉ.राकेशकुमार, प्रमुख वैज्ञानिक व मुख्य, निरी यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

तसेच, मा.उच्च न्यायालयात जनहित याचिका क्र.१८३/२०१२ अंतर्गत पंचगंगा नंदी प्रदूषण संदर्भात महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने मा. उच्च न्यायालय मुंबई येथे प्रतिज्ञा पत्र सादर केलेले असून सदर प्रतिज्ञापत्रात पंचगंगा नदी प्रदुषणास कारणीभूत असणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था, साखर उदयोग, इतर कारखाने, सामाईक औदयोगिक सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणा केंद्र, तसेच जिल्हा परिषद इत्यादी घटकांचा सविस्तर समावेश केलेला असून सदरील बाब न्यायप्रविष्ठ आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**साळाव (जि.रायगड) येथील जेएसडब्ल्यू कंपनीच्या डस्टमुळे गावातील विहिरीतील पाणी प्रदुषित झाल्याबाबत**

**(८) ८००३४ (२१-०४-२०१७). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड जिल्ह्यातील साळाव जेएसडब्ल्यू कंपनीच्या डस्टने साळाव गावातील विहिरी प्रदुषित होत असल्याचा आरोप साळाव गावाच्या महिलांनी केला असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गावाला त्वरित पाणी मिळावे म्हणून साळाव गावातील महिलांनी जेएसडब्ल्यू कंपनीला माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निवेदन सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(४) असल्यास, उक्त निवेदनानुसार साळाव गावाला स्वच्छ पाणी मिळावे याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) तसेच उपरोक्त दोषी कंपनीविरूध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (०५-०३-२०१९) :** (१), (२) व (३) अंशतः खरे आहे.

याबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे कोणतेही निवेदन अथवा तक्रार प्राप्त झालेली नाही. परंतू दि.०९.०६.२०१८ रोजी या अनुषंगाने पाहणी केली असता कंपनी प्रशासनाकडे निवेदन प्राप्त झाल्याचे निर्दशनास आले. पाहणी/ग्रामस्थांच्या भेटी दरम्यान मे.जे.एस.डब्ल्यू लि., या उदयोगाच्या डस्टमुळे पाणी खराब झाले नसल्याचे उपस्थित ग्रामस्थांनी नमुद केले. भेटीचे वेळी सदर विहिरीतील पाण्याचे नमुने गोळा करून पृथ:करणासाठी मध्यवर्ती प्रयोगशाळा येथे पाठविले आहेत.
(४) साळाव या गावास मे.जे.एस.डब्ल्यू. लि., या उदयोगाकडून मागील काही वर्षापासून स्वच्छ पाण्याचा पुरवठा करण्यात येत असल्याचे ग्रामस्थांनी भेटी दरम्यान नमुद केले. तथापि

ग्रामस्थांच्या निवेदनानुसार, उदयोगाने आवश्यक ती कार्यवाही करणेबाबत मंडळाने त्यांच्या दिनांक १४/०६/२०१८ रोजीचे पत्रान्वये सुचित केले आहे. त्यानुसार दि.१९/०६/२०१८ च्या पत्रान्वये जे.एस.डब्ल्यू स्टील लि. यांनी साळाव गावातील विहिरीतील पाणी प्रदूषीत होणार नाही याबाबतची काळजी घेऊ असे आश्वासन दिले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पालघर जिल्हयातील एमआयडीसीच्या कंपन्यांमधून सोडण्यात येणाऱ्या सांडपाण्यामुळे शेतीचे होत असलेले नुकसान

**(९) ८१४९९ (२०-०४-२०१७). श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवापूर (जि.पालघर) येथील बोईसर समुद्रकिनारी भागातील भातशेतीचे एमआयडीसीच्या कंपन्यामधून सोडण्यात येणा-या रसायनयुक्त सांडपाण्यामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त कंपन्यांवर कारवाई करण्यासंदर्भात तसेच भातशेतीचे नुकसान टाळण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (२२-०२-२०१९) :** (१) होय.
(२) व (३) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, तारापूर येथील उद्योगांचे सांडपाणी वाहून नेणारी सामुहिक सांडपाणी प्रक्रिया यंत्रणाची क्षमता ही वाढत्या औद्योगीकरणामुळे अपूरी पडत असल्याने तसेच सांडपाणी वाहून नेणाऱ्या वाहिन्याची दुरूस्ती न केल्यामुळे सदरची घटना घडल्याचे निर्दशनास आले आहे.

महाराष्ट प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून तारापूर औद्योगिक वसाहतीचे नोव्हेंबर-२०१६ व जानेवारी, २०१७ या दोन टप्पात मुख्यालय स्तरावरून सर्व्हे करण्यात आला. त्यामध्ये ५१ उद्योगांना उत्पादन बंदचे आदेश तसेच २४ उद्योगाना प्रस्तावित आदेश तसेच ४० उद्योगांना कारणे दाखवा नोटीसा बजावण्यात आलेल्या असून उद्योगाच्या सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा, हवा प्रदूषण नियंत्रण यंत्रणा व तत्सम बाबींची पाहणी मंडळाकडून नियमितपणे करण्यात येते. सन २०१७ मध्ये केलेल्या पाहणी दरम्यान एका उद्योगाला उत्पादन बंदचे आदेश देण्यात आले असून एकूण ६ उद्योगांना प्रस्तावित आदेश पारित करण्यात आले आहेत.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून नवापूरखाडी परिसरातील पाण्याचे नमूने नियमितपणे संकलित करण्यात येत असून प्रयोगशाळेकडून प्राप्त पृथ:करण अहवाल प्राप्त करण्यात आला आहे.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, तारापूर औद्योगिक संघटन यांचेकडून अतिरिक्त ५० दशलक्ष घन मीटर इतक्या क्षमतेचा सामाईक सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा प्रस्तावित आहे.

सध्या कार्यरत असलेल्या २५ एम एल डी सामाईक सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा योग्य प्रकारे सुरू ठेवल्यास व प्रस्तावित नविन सामाईक औद्योगिक सांडपाणी प्रकिया यंत्रणा पूर्ण करून ७.१ कि.मी इतक्या खोलवर नवापूर येथील समुद्रात सोडण्यास निश्चीतपणे समुद्र व खाडीतील प्रदूषणास आळा बसेल.

---

**मुंबईतील पालिका, शासकीय व खाजगी रुग्णालयाच्या परिसरात ध्वनी प्रदूषणाची पातळी वाढल्याबाबत**

**(१०) ८५५९९ (२१-०८-२०१७). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.योगेश सागर (चारकोप), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील शासकीय, पालिका व खाजगी रुग्णालय परिसरात ध्वनी प्रदूषणाची पातळी वाढली असल्याचे आवाज फाउंडेशनने केलेल्या सर्वेक्षणात माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील केईएम रुग्णालय आणि हिंदुजा रुग्णालय परिसरात तब्बल १०० डेसिबल आवाजाची नोंद करण्यात आली असून केईएम रुग्णालयाबाहेर वाहनांची नेहमीच वर्दळ असल्यामुळे केईएम परिसरातील आवाजाची पातळी सर्वाधिक असल्याचीही नोंद करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच मुंबईसह राज्यात वाहनांच्या धूरामुळे, कारखान्यांच्या रासायनिक मिश्रित दूषित सांडपाण्यामुळे व सणवारी वाजविण्यात येणा-या फटक्यांमुळे मुंबईतील नागरिकांचा प्रदूषणामुळे बळी जाण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त सर्वेक्षणाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार उक्त ध्वनी प्रदूषण रोखण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) तसेच राज्यातील वाढते प्रदूषण रोखण्याकरिता शासनाने कोणत्या विशेष उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (०५-०३-२०१९) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

(४) व (५) ध्वनी प्रदूषण (नियमन व नियंत्रण) नियम २०१७ चा प्रभावीपणे अंमबलबजावणी करण्यासाठी तसेच शांतता क्षेत्र/झोन घोषित करणे बाबत शासन निर्णय दि.२० नोंव्हेबर २०१७ अन्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

---

**माणगांव (जि.रायगड) येथील काळ नदी प्रदूषित झाल्याबाबत**

**(११) ८६४३२ (२१-०८-२०१७). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माणगांव (जि.रायगड) येथील काळ नदीमध्ये शहरातील मोठया गृहप्रकल्प इमारतीचे सांडपाणी सोडल्यामुळे नदी दूषित झाली असून परिसरातील नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (१४-०३-२०१९) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) सदर बाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक २९ जून, २०१७ रोजी प्रस्तावित आदेश दिले आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील जलप्रदूषण टाळण्यासाठी सांडपाणी आणि कारखान्यातील प्रदूषित पाण्यावर पुनर्प्रक्रिया करण्याबाबत**

**(१२) ८८५३८ (२१-०८-२०१७). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जलप्रदूषण टाळण्यासाठी सांडपाणी, कारखान्यातील प्रदूषित पाण्यावर पुनर्प्रक्रिया करून इतर कामासाठी त्या पाण्याचा वापर करावा असे जलतज्ञांचे मत असल्याचे दिनांक १२ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील काही जिल्ह्यातील विविध नद्यावरील प्रकल्प हेच प्रमुख जलस्त्रोत आहेत, हे ही खरे आहे कायृ

(३) असल्यास, जलसाक्षरतेचा अभाव, शेतीमध्ये वापरली जाणारी रासायनिक खाते, रुग्णालयातील केरकचरा, मुदतबाह्य औषधांची योग्य विल्हेवाट लावण्याचा अभाव यामुळेही जलप्रदूषणात वाढ होत आहे, हे ही खरे आह काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार जलप्रदूषण रोखण्याबाबत व प्रदूषित पाण्यावर प्रक्रिया करून पाण्याचा वापर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (०५-०३-२०१९) :** (१) अशी विशिष्ट स्वरुपाची बाब निर्दशनास आलेली नाही तथापि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने कारखान्यातून निर्मित होणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करुन प्रक्रियाकृत सांडपाण्याचा पुर्नवापर उदयोगाच्या प्रक्रियेमध्ये करण्याचे तसेच उदयोगाच्या परिसरातील बागबगीच्यासाठी वापरण्याचे बंधनकारक केलेले आहे. कोणत्याही उदयोगास विनाप्रक्रिया सांडपाण्याचा विसर्ग उदयोगाच्या बाहेर करण्यास परवानगी दिली जात नाही. तसेच, सदर उद्योगास भेटी देऊन प्रक्रिया सयंत्रणेची पाहणी केली जाते व दोषी उदयोगांवर पर्यावरण कायदयाअंतर्गत कारवाई केली जाते. शहरामधून निर्मित होणारे सांडपाणी व घनकचऱ्याच्या व्यवस्थापनासाठी मंडळाने राज्यातील महानगरपालिकांना निर्देश देऊन त्यांच्या वार्षिक अंदाजपत्रकात २५ टक्क्याची तरतूद करण्याचे कळविले आहे.
(२) व (३) होय, तथापि, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ कोणत्याही उदयोगास व सांडपाणी निर्मिती करणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था यांना विनाप्रक्रिया सांडपाण्याचा विसर्ग नैसर्गिक जलस्त्रोत करण्याची परवानगी देत नाही.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ जैववैदयकीय कचऱ्याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावण्यासाठी, राज्यातील वैदयकीय आस्थापनांना निर्देश देऊन त्यांचा जैववैदयकीय

तसेच वैदयकीय आस्थापनांना भेटी देऊन जैववैदयकीय कचऱ्याचे योग्य ते वर्गीकरण केले जाते किंवा कसे याची पाहाणी केली जाते व दोषी आस्थापनांवर पर्यावरण कायदयाअंतर्गत कारवाई केली जाते.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**हातकणंगले (जि.कोल्हापूर) येथील लक्ष्मी औद्योगिक वसाहतीमधून रसायने व दुर्गंधीयुक्त सांडपाणी ओढ्यामध्ये सोडले जात असल्याबाबत**

**(१३) ८८७८३ (१८-०८-२०१७). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हातकणंगले (जि.कोल्हापूर) येथील लक्ष्मी औद्योगिक वसाहतीमधून काही उद्योगांचे रसायन व दुर्गंधीयुक्त सांडपाणी ओढ्यामध्ये सोडले जात असल्यामुळे ओढ्यालगतची शेतजमीन नापिक बनत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले,
(३) असल्यास, चौकशीनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (१६-०३-२०१९) :** (१) लक्ष्मी औदयोगिक वसाहतीमधून ओढयामध्ये सांडपाणी सोडल्यामुळे जमिन नापिक झाल्याबाबत कोणतीही तक्रार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे प्राप्त झालेली नाही.

लक्ष्मी औदयोगिक वसाहतीमध्ये स्थित असलेल्या सामुहिक सांडपाणी प्रक्रिया संयंत्रणेचे प्रक्रियाकृत सांडपाणी १२७ एकर शेत जमिन व १७ एकर बांबू लागवडी साठी वापरले जाते.

(२) माहे जून, २०१८ मध्ये मे. युनिरोज टेक्सटाईल प्रोसेसर्स प्रा. लि., ल.औ.वसाहत या कंपनीची सांडपाणी वाहून नेणारी पाईप लाईन फुटल्यामुळे काही अंशी सांडपाणी नाल्यात मिसळले गेल्यामुळे सदर उदयोगावर कारवाई करण्यात आलेली होती.
(३) मे.युनिरोज टेक्सटाईल प्रोसेसर्स प्रा. लि. प्लॉट नं. ४०,४१, लक्ष्मी औदयोगिक वसाहत, हातकणंगले, जि. कोल्हापूर या उदयोगास दि. ०२.०७.२०१८ रोजी बंदचे आदेश पारित करण्यात आलेले होते व दि. १९.०७.२०१८ रोजी फौजदारी खटला दाखल करण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात ई कचरा उचलणाऱ्या असंघटीत कर्मचाऱ्यांना संरक्षण देणे तसेच ई कचऱ्याची विल्हेवाट लावण्याबाबत

**(१४) ९०३७३ (२१-०८-२०१७). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात स्मार्ट मोबाईल्स, लॅपटॉप, संगणक, टॅबलेटस आदी गॅझेटस् सोबत फ्रीज, कुलर, एसी आणि अनेकविध इलेक्ट्रॉनिक साधनांचा वापर जास्त प्रमाणात होत असल्याने जुन्या इलेक्ट्रॉनिक वस्तुंच्या ई कचऱ्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय
(२) असल्यास, ई कचऱ्यातील अॅसिड आणि इतर घातक घटक वेगळे करण्याच्या प्रक्रियेत सहभागी कामगारांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी ई कचरा उचलणाऱ्या असंघटीत क्षेत्रातील व्यक्तींच्या संरक्षणाबाबत तसेच ई कचऱ्याची संपूर्णपणे विल्हेवाट लावण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, असल्यास, कार्यवाहीचे स्वरूप काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (०८-०३-२०१९) :** (१) ते (३) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांचे मार्फत ई कचरा उत्पादक, ई - कचरा गोळा करणारे केंद्र, डिसमेंटलर व रिसायकलर यांना ई कचरा (व्यवस्थापन) नियम २०१६ अंतर्गत प्राधिकार पत्र संमती पत्र प्रदान करण्यात येतात.

महाराष्ट्रात ई कचऱ्याचे नियोजनबध्द व्यवस्थापन व विल्हेवाट लावण्यासाठी ई कचरा व्यवस्थापन अधिकृत केंद्राना (डिसमेंटलर व रिसायकलर) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी नोंदणीपत्र व संमतीपत्र देऊन मान्यता दिलेली आहे. महाराष्ट्रात एकूण अशी ३२ अधिकृत ई कचरा (डिसमेंटलर-२७ व रिसायकलर-०५) केंद्रे उपलब्ध आहेत. या ३२ अधिकृत ई कचरा (डिसमेंटलर व रिसायकलर) केंद्रांची क्षमता दरवर्षी ४८०६० मे.टन एवढी आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भंडारा जिल्ह्यातील सनफ्लॅग आर्यन ॲड स्टील कंपनी परिसरातील गावामध्ये पाणी, ध्वनी व वायू प्रदूषण होत असल्याबाबत**

**(१५) ९१८०२ (२१-०८-२०१७). श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्ह्यातील सनफ्लॅग आर्यन ॲड स्टील या लोह उत्पादन करणा-या कंपनीच्या सिन्तर, डीआरपी, एसएमएस, एमबीएफ आदी प्लांट मधील उत्पादन वाढविण्याकरिता उक्त कंपनी पाणी, ध्वनी व वायू प्रदूषण करीत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कंपनीतून विषारी वायू सोडला जात असल्याने परिसरातील गावांमध्ये पर्यावरणाचा ऱ्हास होत असून नागरिकांना श्वसनाचे विकार होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार उक्त कंपनीवर कोणती कारवाई केली तसेच प्रदूषण रोखण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (०५-०३-२०१९) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद भंडारा यांच्या अहवालानुसार याबाबत निश्चित निष्कर्षाप्रत जाता येत नाही.

(३) महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने कारखान्यामधून प्रदूषणाचे प्रमाण विहित मर्यादेपेक्षा जास्त आढळून आल्यामुळे दि.९/७/२०१५ रोजी कारखान्याचे उत्पादन बंद करण्याचे निर्देश दिले होते. प्रदुषण नियंत्रण व्यवस्था अद्ययावत करण्याकरीता मंडळाकडून दि.१५/७/२०१५ व दि.२९/७/२०१६ रोजी निर्देश देण्यात आले आहे. त्याचबरोबर माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये रु.९.० लक्ष ची बँक हमी जप्त करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**गाळण बु, (ता.पाचोरा, जि.जळगांव) गावास हगणदारी मुक्त गाव म्हणून अनुदान मिळण्यासाठी बनावट दाखले सादर केल्याबाबत**

**(१६) ९१९९३ (२१-०८-२०१७). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गाळण बु, (ता.पाचोरा, जि.जळगांव) या गावास हगणदारी मुक्त गाव म्हणून अनुदान मिळण्यासाठी बनावट दाखले सादर केल्याचे माहितीच्या अधिकारात प्राप्त झालेल्या माहितीतून माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुसार संबधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२४-०१-२०१९) :** (१) होय.
(२) होय, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पाचोरा यांनी दिनांक २५/४/२०१७ रोजी प्रत्यक्ष चौकशी केली. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पाचोरा यांनी सादर केलेल्या चौकशी अहवालाच्या आधारे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगांव यांनी तत्कालीन ग्रामसेवक श्री.नंदु पाटील यांचेविरुध्द दिनांक ६/७/२०१७ च्या ज्ञापनान्वये शिस्तभंग विषयक कारवाई सुरु केली आहे. श्री. उत्तम गोपिचंद पाटील, तत्कालीन सरपंच हे पदावर नसल्याने त्यांच्याविरुध्द ३९/१ ची कार्यवाही करण्यात आलेली नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**डहाणू- पालघर (जि.पालघर) तालुक्यातील समुद्र किनारपट्टी भागात सीआरझेड कायद्याचे उल्लंघन करून बांधकाम केल्याबाबत**

**(१७) ९३०८३ (२१-०८-२०१७). श्री.अमित घोडा (पालघर) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डहाणू- पालघर (जि.पालघर) तालुक्यातील समुद्र किनारपट्टी भागात सीआरझेड कायद्याचे उल्लंघन करुन भरती मर्यादेपासून ५०० मीटर क्षेत्रात बांधकामे केल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने किती जणांवर कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (०५-०३-२०१९) :** (१) अंशत: खरे आहे.
पालघर तालुक्यात सदरची बाब निदर्शनास आलेली नाही. तथापि डहाणू तालुक्यात १ प्रकरणामध्ये अनधिकृत बांधकाम केल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) तहसिलदार डहाणू यांचेकडून संबंधितांना म.ज.म.अधि.१९६६ चे कलम ४५ प्रमाणे नोटीस देऊन बांधकाम बंद करण्यात आले आहे. तहसिलदार डहाणू यांनी दि. १६/१०/२०१७ अन्वये स्वत:हून बांधकाम दूर करणेबाबत कळविलेले आहे. तसेच ग्रामपंचायत नरपड यांनी दि.१७/५/२०१७ रोजी व प्रादेशिक बंदर अधिकारी मुंबई यांनी दि. २३/५/२०१७ रोजी बांधकाम निष्कासीत करणेबाबत संबंधितांना नोटीस दिली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील स्वच्छता अभियान कार्यक्रम योजनेतंर्गत वैयक्तिक शौचालय अनुदानापासून लाभार्थी वंचित राहिल्याबाबत**

**(१८) ९३२५१ (२१-०८-२०१७). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या संपूर्ण स्वच्छता अभियान कार्यक्रम योजनेतंर्गत वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी शासनाने १२ हजार रूपयांचे अनुदान जाहिर केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू अनुदान ग्रामपंचायतीकडे अदयापी वर्ग झालेले नसल्याने लाभार्थी वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त अनुदान ग्रामपंचायतीकडे अदयापी वर्ग न होण्यामागची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तसेच त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२६-०२-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.

संपूर्ण स्वच्छता अभियान कार्यक्रमाचे नाव बदलून सन २०१२ मध्ये केंद्र शासनाने निर्मल भारत अभियान सुरु केले त्याचे नामकरण दिनांक २ ऑक्टोबर, २०१४ पासून स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) असे करण्यात आले आहे. स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत वैयक्तिक शौचालय बांधल्यावर विविक्षित गटांतील लाभार्थी घटकांसाठी प्रोत्साहनपर रक्कम रुपये १२,०००/- इतकी ठरविण्यात आली आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत केंद्र व राज्य हिस्यांतर्गत प्राप्त निधी राज्य शासनाकडून जिल्हा परिषदांना वितरीत करण्यात येतो. ग्रामपंचायतींना थेट वितरीत करण्यात येत नाही. जिल्हा परिषदांकडून सदर निधी संबंधित पंचायत समिती / ग्रामपंचायतींना वितरीत करण्यात येतो. वित्तीय वर्ष २०१८-१९ मध्ये स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत केंद्र हिस्सा रु.१३५२९२.१९ लक्ष व अनुरुप राज्य हिस्सा राज्य शासनाकडून जिल्हा परिषदांना वितरीत करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### तळोजा (पनवेल) औद्योगिक वसाहतीतील डुकॉल कंपनीमुळे तळोजा, पनवेल व खारघर परिसरात वाढत असलेल्या प्रदूषणाबाबत

**(१९) ९४९३३ (२५-०९-२०१७). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (नवीमुंबई) तळोजा औद्योगिक वसाहत येथील डुकॉल कंपनीतून प्रदूषण होत असून कासाडी नदी व अंतर्गत गटारांमध्ये तळोजा परिसरातील रसायनयुक्त प्रदूषित पाणी वाहून जात असल्याचे दिनांक १९ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त वाढत्या प्रदुषणामुळे तळोजासह पनवेल व खारघर परिसरही प्रदूषित होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तळोजा औद्योगिक वसाहत परिसरातील प्रदूषण रोखण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (२२-०२-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) मे. डयुकॉल औरगॅनिक्स ॲण्ड कलर्स प्रा.लि,प्लॉट नं.जी-७ एमआयडीसी तळोजा याना प्रादेशिक अधिकारी, नवी मुबई यांनी दिनांक १८.०८.२०१७ अन्वये उत्पादन बंद करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच उप विभागिय अभियंता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ याना दिनांक २८.०८.२०१७ रोजी समज पत्र दिले आहे. तसेच, जल (प्र व प्रनि) कलम ३३ (अ) अन्वये सांडपाणी यंत्रणा सुधारण्याबाबत आदेश बजावण्यात आलेले आहेत.
(४) प्रश्न उदभवत नाही.

---

## राज्यात एकही शांतताप्रवण क्षेत्र नसल्याची माहिती राज्यशासनाने मा.उच्च न्यायालयात दिल्याबाबत

**(२०) ९५३१० (३०-१२-२०१७). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.जयकुमार गोरे (माण):** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात एकही शांतताप्रवण क्षेत्र नसल्याची माहिती राज्यशासनाने मा. उच्च न्यायालयात दिल्याचे माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, केंद्र शासनाने ध्वनीप्रदूषण नियमांत दुरुस्त्या केल्या असून या नव्या नियमांनुसार रुग्णालये, न्यायालये आणि शैक्षणिक संस्था यांचा समावेश शातंता प्रवण क्षेत्रात येत नसल्याचे म्हटले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने रुग्णालये, न्यायालये व शैक्षणिक संस्था मधील शातंता प्रवण क्षेत्र हटविण्यामागील कारणे काय आहेत,
(४) असल्यास, राज्यात वाढते ध्वनीप्रदूषण रोखण्यासाठी शासनाने अध्यादेश काढून राज्यातील शांतताप्रवण क्षेत्रांची यादी घोषित करुन रुग्णालये, न्यायालये व शैक्षणिक संस्था शातंता प्रवण क्षेत्रात समाविष्ट करुन घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाच कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (२२-०३-२०१९) :** (१) हे खरे नाही.
(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**डोंबिवली, अंबरनाथ, बदलापूर (जि.ठाणे) येथील रासायनिक कारखान्यातील प्रदूषणामुळे उल्हास व वालधूनी नदीसह कल्याण खाडी प्रदूषित झाल्याबाबत**

**(२१) ९५५५७ (३०-१२-२०१७). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.योगेश सागर (चारकोप), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंबिवली, अंबरनाथ, बदलापूर (जि.ठाण) रासायनिक कारखान्यातील प्रदूषणामुळे उल्हास व वालधूनी नदीसह कल्याण खाडी प्रदूषित झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच उल्हासनगर मधून वाहणारा खेमानी नाला उल्हास नदीला मिळाल्याने उल्हास नदीचे पाणी मोठ्या प्रमाणात प्रदूषित झाल्याने शहरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उल्हासनगर मधील वनशक्ती संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी उल्हास नदी व खेमानी नाल्यातील पाण्याचे नमुने घेऊन त्याचा अहवाल मा.सर्वोच्च न्यायालयात सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रदूषण रोखण्यासाठी आतापर्यंत काय केले व पुढे काय करणार अहे असा सवाल मा.सर्वोच्च न्यायालयाने पर्यावरण खात्याला विचारला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आहे व त्यानुसार उक्त प्रदूषण रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (२२-०३-२०१९) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) अशा प्रकारच्या तक्रारी प्राप्त नाहीत.
(३) सदर बाब निर्दशनास आलेली नाही.
(४) व (५) उल्हास व वालधुनी नदी प्रदूषण रोखण्यासाठी संबंधित विभागाने तयार केलेल्या कृती आराखडयाची अंमलबजावणी मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखालील समिती पाठपुरावा करीत आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भिवंडी (जि.ठाणे) येथील कशेळी-काल्हेर व खारेगाव टोलनाका ते माणकोली नाका परिसरात तिवरांची तोड करुन अनधिकृत बांधकाम करण्यात येत असल्याबाबत**

**(२२) ९६६६९ (३०-१२-२०१७). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) येथील कशेळी-काल्हेर व खारेगाव टोलनाका ते माणकोली नाका परिसरात तिवरांची तोड करून अनधिकृत बांधकाम केल्याप्रकरणी नारपोली, भिवंडी, कोनगांव येथे दाखल केलेल्या ३० गुन्हयांतील ५८ आरोपींना केव्हा अटक केली तसेच त्यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(२) असल्यास, नारपोली, कोनगाव व कशेळी-काल्हेर पट्टयातील पाणथळ जागेवर प्रत्येकी किती अनधिकृत कामे झाली आहेत याची पहाणी शासनाने केली आहे काय,

(३) असल्यास, उक्त ठिकाणी किती व कोणकोणत्या कामाची पहाणी शासनाने केली आहे तसेच सदर अनधिकृत कामाच्या संदर्भात कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (०८-०३-२०१९) :** (१) मौजे केवणी, दिवे अंजूर, कशेळी, काल्हेर कोन या गावच्या खाडीकिना-यावर कांदळवनाचा ऱ्हास तसेच कांदळवनावर माती व डॅब्रीजचा भराव याबाबत प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने उप-विभागीय अधिकारी, भिवंडी यांनी संबंधित इसमांवर पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ चे कलम १५ व १९ अन्वये १.नारपोली पोलीस स्टेशन- २६, २.कोनगाव पोलीस स्टेशन-१, ३. तालुका पोलीस स्टेशन भिवंडी-३ असे एकूण ३० गुन्हे दाखल केलेले आहेत. या प्रकरणांमध्ये दोषारोप सादर केले असून सदर बाब न्याय प्रविष्ठ आहे.

(२) दि. ०२/७/०१७ व दि. ०५/०७/०१७ रोजी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व मंडळ अधिकारी भिवंडी यांनी संयुक्त पहाणी केली आहे.

(३) दि. ०५/७/०१७ रोजी करण्यात आलेल्या पाहणीमध्ये रेती बंदर काल्हेर येथील रू. नं. १०८/०८ येथे नाल्या लगत खाजगी जमीनीवर भराव टाकल्याचे आढळून आले. महसूल विभागाने सदर जागा मालकावर गुन्हा दाखल केलेला आहे. सदर जागा खाडी किना-यापासून ४०० ते ५०० मी. अंतरावर आहे. सदर नाल्याच्या बाजूला गाळा नं. बी-१०२ येथे मे. पायोनियर कोट्स आणि कलर्स नावाचा उदयोग म.प्र.नि. मंडळाच्या परवानगीशिवाय सुरू होता. त्यामध्ये कलर मिक्सींग व ब्लेंडींग करून पॅक केला जात होता. सदर उदयोगास बंदचे आदेश देण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धनगरवाडी (सोनई) (ता.नेवासा, जि.अहमदनगर) येथील पाणी साठवण तलावामध्ये सोनई ग्रामपंचायतीकडून वाहनाद्वारे घनकचरा टाकण्यात येत असल्याबाबत**

**(२३) ९८२०७ (३०-१२-२०१७). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धनगरवाडी (सोनई) (ता.नेवासा, जि. अहमदनगर) येथील पाणी साठवण तलावामध्ये गत काही महिन्यापासून सोनई ग्रामपंचायतीकडून वाहनाद्वारे घनकचरा मोठया प्रमाणात टाकण्यात येत असल्याची तक्रार धनगरवाडी येथील ग्रामस्थांनी व स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त घनकच-यामुळे या तलावाचे पाणी दूषित होऊन नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार पाणी साठवण तलावाच्या स्वच्छतेबाबत कोणती कार्यवाही केली तसेच संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (०५-०३-२०१९) :** (१) व (२) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, विभागीय कार्यालय, नाशिक यांचेकडे कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

(३) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिका-यांनी या घटनेबाबत दि. ७/२/२०१८ रोजी पहाणी केली असून धनगरवाडी गावात साठवण तलाव असल्याचे आढळून आले. सदर तलावाच्या आजूबाजूला वस्ती आढळली नाही पण शेती आढळली. सदरील तलावात २० टक्के पाणी आढळले आणि त्यात काही जलचर प्राणी देखील आढळले. सदर तलावाचे पाणी पिण्यासाठी तसेच शेतीसाठी वापरले जाते, असे तेथील एका ग्रामस्थाने सांगितले. सदर तलाव हा मानव निर्मीत तलाव आहे. भेटी दरम्यान तलावात अथवा बाजूला घनकचरा टाकत असल्याचे आढळून आले नाही, तसेच याआधी देखील तिथे घनकचरा टाकल्याच्या खुणा आढळून आल्या नाहीत. तसेच सदर विषयाबाबत ग्रामपंचायत सोनई यांनी पत्र क्र. ११०/२०१८, दि २०/२/२०१८ अन्वये कळविले आहे की, सोनई ग्रामपंचायत मार्फत धनगरवाडी पाणी साठवण तलावात अथवा तलावालगत कुठल्याही प्रकारचा घनकचरा टाकण्यात येत नाही व टाकण्याचे कोणत्याही प्रकारचे प्रयोजन नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पनवेल (ता.पनवेल, जि.रायगड) येथील सांडपाण्यामुळे गाढी नदीचे पाणी प्रदुषित झाल्याबाबत**

**(२४) ९८२५१ (३०-१२-२०१७). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (ता.पनवेल, जि.रायगड) येथे वाढत्या नागरीकीकरणामुळे गाढी नदीच्या आसपासच्या परिसरात विकासकाने इमारती उभारताना सांडपाणी वाहून जाण्याचे योग्य नियोजन न करता भूमीगत गटारातून सांडपाणी गाढी नदीत सोडल्यामुळे नदी दुषित झाली असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त परिसरात इमारतींमधून मोठयाप्रमाणात सोडण्यात येणा-या सांडपाण्याच्या दुर्गंधीमुळे आजुबाजूच्या परिसरातील नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाल्याबाबत मा.पर्यावरण मंत्री यांनी तातडीने बैठक आयोजित करण्याचे आश्वासन दिनांक २३ मार्च, २०१७ रोजी वा त्यासुमारास दिले असताना अद्यापही कोणतीच बैठक आयोजित करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार गाढी नदीतील प्रदुषण रोखण्याबाबत कोणती तातडीची उपाययोजना व कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, कार्यवाहीचे स्वरूप काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (०५-०३-२०१९) :** (१) हे खरे नाही,
(२) व (३) पनवेल महानगरपालिकेकडून दिनांक २३ नोव्हेंबर, २०१७ व ०६ डिसेंबर, २०१७ रोजी प्राप्त झालेल्या माहितीनुसार "पनवेल शहरातील सांडपाणी प्रक्रियेकरीता महानगरपालिकेचे मालकीचे १४ एम.एल.डी. क्षमतेचे सिवरेज ट्रिटमेंट प्लांट येथे सम्पवेल/वेटवेल मध्ये भुयारी गटार पाईप लाईनद्वारे संकलित केले जाते. त्यानंतर संकलित झालेल्या सांडपाण्यावर प्रक्रिया केली जाते. सबब, पनवेल शहारातील कचरा, घाण सांडपाणी गाढी नदीत सोडले जात नाही. तथापि, भविष्यात या संदर्भात आवश्यक त्या सर्व उपयायोजना महानगरपालिकेमार्फत कालबध्द पध्दतीने करण्याचे निश्चित आहे."
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील समुद्र किना-यालगतच्या बांधकामांना सीआरझेडची ५०० मीटरची मर्यादा ५० मीटरवर आणण्याचा प्रस्ताव शासनाने केंद्र शासनाकडे मंजूरीसाठी पाठविल्याबाबत**

**(२५) १०४८१६ (०६-०४-२०१८). श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील समुद्र किना-यालगतच्या बांधकामांना सीआरझेडची ५०० मीटरची मर्यादा ५० मीटरवर आणण्याचा प्रस्ताव शासनाने केंद्र शासनाकडे मंजूरीसाठी पाठविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कोकण विभागातील, सागरी किनारा क्षेत्रात, विकास कामांना चालना देण्यासाठी, ५०० मीटर ची मर्यादा, ५० मीटरवर आणणेबाबतचा प्रस्ताव केंद्र सरकारला पाठवून त्यास विनाविलंब मान्यता मिळण्याच्या दृष्टीने, अद्याप शासनातर्फे कार्यवाही करुन कोणते प्रयत्न करण्यात आले आहेत वा येत आहेत,
(३) असल्यास, केंद्र शासनाने सदर प्रस्तावास मान्यता दिली आहे काय, त्यानुषंगाने अंमलबजावणीची सद्यःस्थिती काय आहे,
(४) अद्याप केंद्र शासनाने मंजूरी दिली नसल्यास, राज्य शासनाकडून करण्यात येत असलेल्या पाठपुराव्याचे स्वरुप काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (२२-०२-२०१९) :** (१) राज्य शासनाच्या महाराष्ट्र सागरी किनारा व्यवस्थापन प्राधिकरणाने दि. ०८.०१.२०१८ रोजीच्या पत्राद्वारे केंद्रिय पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांना खाडी व नदी याकरीता सागरी नियमन क्षेत्र ५० मीटर करण्याबाबत प्रस्ताव सादर केला होता.
(२) केंद्रिय पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांनी दि. १८.०४.२०१८ रोजी प्रारुप सागरी नियमन अधिसूचना, २०१८ प्रसिद्ध केली होती. महाराष्ट्र सागरी किनारा व्यवस्थापन प्राधिकरणाने दि.१२.०६.२०१८ रोजीच्या पत्रान्वये प्रारुप सागरी नियमन अधिसूचना, २०१८ वर हरकती व सुचना दाखल केल्या होत्या.
(३) केंद्रिय पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांनी दि. १८.०१.२०१९ रोजी अंतिम सागरी नियमन अधिसूचना, २०१९ प्रसिद्ध केली आहे. सदर अधिसुचनेनुसार, समुद्राकरीता ५०० मीटरची सि.आर.झेड ची मर्यादा कायम असून खाडी व नदी याकरीता सिआरझेडची मर्यादा खाडीची रूंदी किंवा उच्चतम भरती रेषेपासून ५० मी. पर्यंत निश्चित केली आहे. जी पूर्वी सि. आर. झेड. अधिसुचना, २०११ मध्ये खाडी व नदी याकरीता उच्चतम भरती रेषेपासून १०० मी. अंतरापर्यंत होती.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही
(५) प्रश्न उद्‌भवत नाही

---

**राज्यात प्लॅस्टिक कचऱ्याबाबत महानगरपालिका तसेच जिल्हाधिकारी यांना हरीत लवादाने पाठविलेल्या नोटीशीबाबत**

**(२६) १०५५९७ (१९-०४-२०१८). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात प्लॅस्टिक कचऱ्याबाबत राष्ट्रीय हरीत लवादाकडे करण्यात आलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने शासनाला कायदयाने राज्यस्तरीय सल्लागार समितीची स्थापना करण्याचे आदेश दिनांक १४ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त लवादाने आदेश दिल्यानुसार समिती स्थापन करण्यात आली, परंतु त्या समितीचे कामकाज अद्यापही सुरु झाले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील ज्या नगरपरिषदा आणि महानगरपालिका लवादाच्या आदेशाचे पालन करणार नाहीत, त्यांच्यावर कारवाई करण्याचे आदेश लवादाने समितीलाच दिले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार हरीत लवादाच्या आदेशाची अंमलबजावणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (०८-०३-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.

प्राध्यापक रविद्र बजरंग शिंदे यांनी राष्ट्रीय हरित लवादाकडे सादर केलेल्या अर्ज क्रमांक-०२/२०१६, दिनांक १४/१२/२०१५ अन्वये याचना क्रमांक २ मध्ये शासनास राज्यस्तरीय सल्लागार समिती स्थापन केल्याबाबतची माहिती सादर करण्याबाबत निर्देश देण्यात यावे, अशी याचिका सादर केली आहे.
(२) हे खरे नाही.

प्लास्टिक कचरा व्यवस्थापन नियम २०१६ च्या कलम १६ च्या तरतुदीनुसार महाराष्ट्र शासनाने दिनांक ४ जानेवारी, २०१७ रोजी राज्यस्तरीय सल्लागार समिती स्थापित केली असून, सदर नियमांचे संनियंत्रणासाठी सदर समितीची पहिली बैठक दिनांक २ जून, २०१७ रोजी आयोजित करण्यात आली होती.
(३) राष्ट्रीय हरित लवादाने दिनांक ०७ नोव्हेंबर, २०१७ रोजीच्या सुनावणीच्या अनुषंगाने राज्यस्तरीय सल्लागार समितीला ज्या स्थानिक स्वराज्य संस्थांनी अविघटनशील नागरी घनकचरा संकलन व साठवणुकीसाठी निवडलेली जागा व जबाबदारी न पाळणा-या स्थानिक स्वराज्यांविरुध्द कारवाई केल्याबाबतचा विस्तृत अहवाल सादर करण्याबाबत आदेश पारित केले आहेत.
(४) हरित लवादाच्या आदेशानुसार स्थानिक स्वराज्य संस्थां विरुध्द कारवाईबाबतची अंमलबजावणी नगर विकास विभागामार्फत करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भंडारा जिल्हयातील नाग नदीच्या दुषित पाण्याने वैनगंगा नदी प्रदूषित होत असल्याबाबत**

**(२७) १०८०७२ (१४-०४-२०१८). श्री.चरण वाघमारे (तुमसर), श्री.विजय रहांगडाले (तिरोडा) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्ह्यातील वैनगंगा नदी नाग नदीच्या पाण्याने प्रदूषित होत असल्याचे दिनांक २ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) भंडारा जिल्यातील गोसेखुर्द धरण बंद असल्यामुळे वैनगंगा नदीचा प्रवाह बंद असून वैनगंगा नदीच्या पाण्यात नाग नदीचे पाणी मिसळून पाणी दुषित होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वैनगंगा नदीतून पाणीपुरवठा योजनेद्वारे जनतेला दुषित पाण्याचा पुरवठा केला जात आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहे ?

**श्री. रामदास कदम (०५-०३-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.
(३) अंशत: हे खरे आहे.
कार्यकारी अभियंता, ग्रामिण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, भंडारा यांच्या अहवालानुसार नाग नदीच्या दूषित पाण्यामुळे एकुण ४५ गांवे बाधीत झाली आहेत. सदर ४५ गावांपैकी ३० गावांमध्ये जलशुध्दीकरण यंत्र (RO Plant) ग्रामिण पाणी पुरवठा विभागामार्फत लावण्यात आले आहे. उर्वरीत १५ गावांमध्ये नाविन्यपुर्ण योजने अंतर्गत, खनिज प्रतिष्ठाण निधी मधून जलशुध्दीकरण यंत्र लावण्याचे प्रस्ताव सादर करण्यात आले आहे. सद्यस्थितीत या गावांमधील ब्लिचींग पावडरद्वारे नियमीत शुध्दीकरण करून पाणी पुरवठा सुरू आहे.
(४) नाग नदीच्या प्रदुषणास प्रमुख कारण असलेल्या नागपुर महानगरपालिकेस महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने जल (प्रतिबंध व प्रदुषण नियंत्रण) कायदा, १९७४ अंतर्गत वेळोवेळी कार्यवाही केलेली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## तेरवाड (ता.शिरोळ) येथे पंचगंगा नदी प्रदूषित तसेच जलपर्णी वाढल्यामुळे मासे व इतर जलचर मृत होत असल्याबाबत

**(२८) १०९७४४ (११-०४-२०१८). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पंचगंगा नदीच्या प्रदूषणाबाबत उपाययोजना करण्यासाठी कोल्हापूर येथील उपविभागीय अधिकारी यांच्या आदेशाने नियुक्त झालेल्या समितीने कोल्हापूर शहरातील १२ नाल्यांवर जाऊन पंचगंगा नदीच्या पाण्याचे नमुने घेऊन पृथक्करणासाठी चिपळूण येथील प्रयोगशाळेकडे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान सादर केले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तेरवाड (तालुका शिरोळ) येथे पंचगंगा नदीच्या बंधाऱ्यात पाणी प्रदूषित झाल्यामुळे व जलपर्णी वाढल्यामुळे मासे व जलचर मृत झाल्याची घटना दिनांक ९ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, कोल्हापूर येथील जयंती नाला आणि कसबा बावडा येथील सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प ही कामे अपूर्ण असल्यामुळे पंचगंगा नदीत थेट सांडपाणी मिसळत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(५) असल्यास, पंचगंगा नदीचे प्रदूषण रोखण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे, अथवा करण्यात येत आहे नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (०५-०३-२०१९) :** (१) हे अंशतः खरे आहे.

मा.उच्च न्यायालय यांनी जनहित याचिका क्र. १८३/१२ अन्वये दिलेल्या निर्देशास अनुसरुन मा.विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली आढावा व तपासणी या दोन उप समित्या गठित करण्यात आल्या होत्या. तपासणी समितीमध्ये उप विभागीय अधिकारी हे अध्यक्ष आहेत.

तपासणी समितीच्या सदस्यांसोबत माहे जानेवारी, २०१८ मध्ये कोल्हापूर शहरातील नाल्यांमधील व पंचगंगा नदीचे पाणी गुणवत्ता तपासणीसाठी नमुने गोळा करण्यात आले होते व ते पृथःकरणासाठी चिपळूण येथील प्रयोगशाळेत पाठविण्यात आले होते. प्राप्त झालेल्या अहवालावरुन नदीतील पाण्याची गुणवत्ता खालावलेली असल्याचे दिसून येते.

(२) हे अंशतः खरे आहे.

दि.२७.१२.२०१७ रोजी पंचगंगा नदीच्या तेरवाड बंधा-यालगत मासे मृत झाल्याबाबतची तक्रार ग्रामस्थांनी केली होती.

दि. २७.१२.२०१७ रोजी तेरवाड बंधारा येथे पंचगंगा नदीची पहाणी दरम्यान मृत मासे आढळून आले होते. तेथील मृत माशांचा नमुना न्यायवैदयक प्रयोगशाळा, कोल्हापूर येथे पाठविण्यात आला होता. दि. १४.०२.२०१८ रोजी न्यायवैदयक प्रयोगशाळेचा अहवाल प्राप्त झालेला आहे. त्यामध्ये कोणत्याही विषारी रसायनाचा अंश आढळला नसल्याचे नमुद केलेले आहे.

(३) हे अंशतः खरे आहे.

दि. १४.०९.२०१७ रोजी जयंती नाला येथील सांडपाणी वाहून नेणारी पाईप लाईन तुटल्यामुळे मैलायुक्त सांडपाणी जयंती नाल्याव्दारे पंचगंगा नदीत मिसळत होते. सदर पाईप लाईनची दुरुस्ती दि. १५.०१.२०१८ रोजी करण्यात आलेली आहे व जयंती नाल्यातील सांडपाणी कसबा बावडा येथील ७६ द.ल.लि. क्षमतेच्या सांडपाणी प्रक्रिया संयंत्रणेमध्ये प्रक्रिया करण्यासाठी पाठविण्यात येत आहे. सदयस्थितीत ५५ द.ल.लि. क्षमतेने सांडपाणी प्रक्रिया संयंत्रणा चालू आहे.

(४) म.प्र.नि. मंडळातर्फे पंचगंगा नदीचे प्रदूषण रोखण्यासाठी कोल्हापूर महानगरपालिकेस तसेच इचलकरंजी नगरपरिषदेस निर्देश दिलेले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नवी मुंबई शहरात जल आणि वायूप्रदूषण होत असून हे प्रदूषण करणा-या कंपनीला देण्यात आलेल्या कारणे दाखवा नोटीसीबाबत**

**(२९) ११०१८५ (११-०४-२०१८). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई शहरात जल आणि वायूप्रदूषण होत असून हे प्रदूषण करणाऱ्या कंपनीला कारणे दाखवा नोटीसा दिल्याचे दिनांक १८ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.पर्यावरण मंत्री यांनी माहिती दिली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यानुसार कोणकोणत्या कंपन्यांना नोटीसा देण्यात आल्या आहेत,

(३) असल्यास, शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (०५-०३-२०१९) :** (१), (२) व (३) नवी मुंबई शहरात जल व वायु प्रदुषण करणाऱ्या पुढील कंपन्याना माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने कारणे दाखवा नोटीसा बजावण्यात आल्या होत्या. १) मे.मयुर केमीकल्स, प्लॅाट नं.सी-४६२, एमआयडीसी महापे, नवी मुंबई. २) मे.व्हि.बी. टेक्सोआ प्रा.लि.प्लॅाट नं.ए-३६, एमआयडीसी महापे, नवी मुंबई. ३) मे.अपना ॲरगॅनिक प्रा.लि.प्लॅाट नं.ए-६६४, एमआयडीसी महापे, नवी मुंबई.

(४) प्रश्न उद्भवत नाही

---

**राज्यातील बॅटरी व्यावसायिकांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून परवाना न घेता व्यवसाय सुरु केला असल्याबाबत**

**(३०) १११६८ (१४-०४-२०१८). श्री.विजय काळे (शिवाजीनगर), प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र सरकारने 'दि बॅटरीज मॅनेजमेंट ॲड हॅडलिंग' नियमावली दिनांक १५ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास तयार केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बॅटरी ॲसिडची केंद्र सरकारने धोकादायक म्हणून नोंद केल्याने वाहनांमधली बॅटरीची निर्मिती पुनर्वापर आणि विक्रीबाबत राज्य शासनाकडून परवाना घेणे आवश्यक आहे हे, ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात बहुतांश बॅटरी व्यवसाय आणि उद्योगांशी निगडीत ठिकाणे विक्री करणारी प्रतिष्ठाने यांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून परवाना मिळविलेला नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्य शासनाच्या पर्यावरण विभागाने बॅटरी व्यवसायासंदर्भात कोणतेही आदेश निर्गमित केलेले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, बॅटरी निर्मिती, पुनर्वापर आणि विक्री प्रतिष्ठानने बहुतांश नागरी वस्त्यांमध्ये असल्याने परवानगी देताना महापालिका पोलीस अथवा शॉप अॅक्ट अधिकाऱ्यांनी सदर प्रतिष्ठानच्या संचालकांनी पर्यावरण विभागाशी संबधित ना-हरकत प्रमाणपत्र घेतले नसल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, राज्यातील २६ महापालिका व २३६ नगरपालिका मध्ये विनापरवाना व्यवसाय करणाऱ्या बॅटरी व्यवसाय आस्थापनावर पर्यावरण विभागाच्या महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून काय कार्यवाही करण्यात आली आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (१६-०३-२०१९) :** (१) केंद्र सरकारने 'दि बॅटरीज मॅनेजमेंट अॅड हँडलिंग' नियमावली दि. १६ मे २००१ रोजी प्रकाशित केली असून दि. ४ मे २०१० रोजी सदर नियमावलीमध्ये सुधारणा करण्यात आली आहे.

(२) हे खरे आहे.

(३) अंशत: खरे आहे.

अ) बॅटरी पुर्नसायकल करणाऱ्या उद्योगांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून परवानगी घेतली आहे.

ब) तथापी, बॅटरी विक्रेत्यांकडून परवाना घेणेबाबत प्रतिसाद कमी आढळून येत आहे.

(४) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने वेळोवेळी आदेश / परिपत्रक निर्गमित केले आहेत.

(५) बॅटरी निर्मिती व पुर्नसायकल करणाऱ्या उद्योगांना परवानगी देत असतांना स्थानिक स्वराज्य संस्थेचे नाहरकत प्रमाणपत्र घेतले जाते.

(६) विना परवाना बॅटरी व्यवसाय करणाऱ्या उद्योजकांवर कारवाई करण्याबाबतचे आदेश उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांना देण्यात आले आहेत.

---

## नायगांवच्या (जि.पालघर) प्रदूषित खाडीत हजारो मृत मासे आढळल्याबाबत

**(३१) ११२४०२ (११-०४-२०१८). श्री.पास्कल धनारे (डहाणू), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.अमित घोडा (पालघर) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नायगावच्या प्रदूषित खाडीतील हजारो मासे मृत स्थितीत गास सनसिटी येथील किनाऱ्यावर माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान वाहून आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या परिसरातील नवघर, वालीव, गोखिवरे, सातीवली, चिंचपाडा या भागात मोठया प्रमाणावर औद्योगिक कंपन्यांमधून घातक रसायने या खाडीमध्ये सोडली जात आहेत व त्याचा परिणाम खाडीतील जीवसृष्टीवर होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बाब क्र. १ व २ बाबत पहाणी वा चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने या परिसरातील ज्या औद्योगिक कंपन्यांकडून घातक रसायने खाडीमध्ये सोडली जातात त्या कंपनी मालकाविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (१६-०३-२०१९) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे व पालघर जिल्हा प्रारुप किनाराक्षेत्र व्यवस्थापन**
**आराखड्यास स्थगिती देण्याच्या मागणीबाबत**

**(३२) ११३२७९ (२४-०४-२०१८). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हा प्रारुप किनाराक्षेत्र व्यवस्थापन आराखडा आदिवासी बहुल जिल्ह्यातील जनतेसाठी मराठीत प्रसिध्द करावा तसेच त्याची वेबसाईट उघडत नसल्यामुळे स्थानिक जनतेला आक्षेप नोंदविता येत नसल्याने दिनांक २९ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास आयोजित करण्यात आलेल्या सुनावणीस स्थगिती देऊन मुदतवाढ देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी व जनतेने केली होती, हे खरे आहे काय,

(२) तसेच ठाणे जिल्हयात पर्यावरणाचा ऱ्हास न होऊ देता संतुलित विकास करणेसंदर्भात ठाणे जिल्हयाच्या प्रारुप किनारा क्षेत्र व्यवस्थापन आराखडयासंदर्भात लोकप्रतिनिधीसह जिल्हाधिकारी, ठाणे व सर्वसंबंधितांसमवेत जनसुनावणी दिनांक ३० जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास घेण्यात आलेली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सीआरझेडची मान्यता संपलेली असून त्यावरील बांधकामांना प्रतिबंध घालण्याकरिता ठाणे-पालघर प्रारुप किनारा क्षेत्र व्यवस्थापन आराखडा तयार करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त आराखडा प्रसिध्द करून हरकती व सूचना मागविण्यात आल्या आहेत काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले व त्यानुसार उक्त दोन जिल्ह्यातील पर्यावरणाच्या संवर्धनासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (२२-०२-२०१९) :** (१) ते (६) सि.आर.झेड. अधिसूचना, २०११ नुसार ठाणे व पालघर जिल्ह्यांचे प्रारुप किनारा क्षेत्र व्यवस्थापन आराखडे बनविण्याचे काम केंद्रिय पर्यावरण, वने व वातावरणीय बदल, नवी दिल्ली यांनी प्राधिकृत केलेल्या सेस, केरळ या संस्थेमार्फत

पुर्ण झाले होते. सदर आराखडे दि.३०.११.२०१७ रोजी नागरीकांच्या हरकती व सुचनांसाठी ४५ दिवसांची मुदत देऊन प्रसिद्ध करण्यात आले होते. जिल्हाधिकारी ठाणे व पालघर यांच्या अध्यक्षतेखाली ठाणे व पालघर जिल्हयांचे प्रारुप किनारा क्षेत्र व्यवस्थापन आराखड्यांवर दि. २९.०१.२०१८ रोजी जनसुनावणी घेण्यात आली. सदर जनसुनावणीस स्थगिती देऊन मुदतवाढ देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी व जनतेने केली होती. ठाणे व पालघर जिल्हयांचे प्रारुप किनारा क्षेत्र व्यवस्थापन आराखड्यांवर नागरिकांकडुन प्राप्त झालेल्या हरकती, सुचना व जनसुनावणीचा अहवाल पुढिल कार्यवाहीसाठी सेस, केरळ यासंस्थेकडे दि. ०६.०३.२०१८ व १५.०३.२०१८ रोजीच्या पत्रान्वये पाठविण्यात आले आहे. सदर ठाणे व पालघर जिल्हयांचे आराखडे, कैंद्रिय पर्यावरण, वने व वातावरणीय बदल, नवी दिल्ली यांच्याकडील मंजुरीच्या अंतिम टप्यात आहे.

---

**डहाणू (जि.पालघर) येथे बोटीतून होत असलेल्या कोळशाच्या वाहतुकीमुळे प्रदुषण होत असल्याबाबत**

**(३३) ११४७४१ (२४-०४-२०१८). श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रीन झोन असलेल्या डहाणू (जि.पालघर) मधील रिलायन्स एनर्जीला बोटीतून कोळशाची वाहतूक होत असताना कोळसा समुद्रात पडत असतो, समुद्रालगत कोळशा साठविल्याने मासेमारीस बंदी येऊन पर्यावरणाचा ऱ्हास होत असल्याचे स्थानिक लोकांचे तक्रारी निदर्शनास येत आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ग्रीन झोन भागात उपरोक्त कोळशाने परिसरामध्ये प्रदूषण होऊन पर्यावरणास धोका निर्माण होत आहे तसेच कोळशा पुरविणाऱ्या बोटींना खाडीत उभे राहण्यास परवानगी आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व संबधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (०५-०३-२०१९) :** (१) हे खरे नाही.

(२) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने कोळसा वाहतूकीकरिता दि.२२/१/२०१८ रोजी संमती पत्र प्रदान केले आहे.

उद्योगाने कोळसा वाहतुकीकरिता बंदराचा वापर करण्यासाठी महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाकडून दि. २६/१०/२०१७ रोजी सदरील बंदर विकसीत करण्यासाठी व चालविण्यासाठी १५ वर्षाच्या करारावर घेतले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाड (जि.रायगड) येथील औद्योगिक वसाहतीच्या सांडपाणी पाईप लाईनच्या कामास मंजूरी मिळण्याबाबत**

**(३४) ११६६३९ (२३-०७-२०१८). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड (जि.रायगड) येथील औद्योगिक वसाहतीच्या सांडपाण्याने सावित्री खाडी प्रदूषित होत असल्याने हे सांडपाणी सव्वादोन किमी दूर सोडण्यासाठी असलेल्या पाईपलाईनच्या कामाला मंजूरी मिळाली असून सदर काम प्रलंबित असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (०५-०३-२०१९) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

सध्याचा उत्र्सजन बिंदू ओवळे येथे खाडी किनारी असल्याने, मौजे ओवळे पासून राष्ट्रीय समुद्र विज्ञान संस्थेने (NIO) सुचविलेल्या ठिकाणापर्यंत सावित्री खाडीत खोल २.२ कि.मी. पाईपलाईन टाकण्याच्या कामास महाराष्ट्र औदयोगीक विकास महामंडळाकडून मंजूरी प्राप्त झालेली होती. माहे फेब्रुवारी - २०१८ मध्ये महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांनी सदर कामाकरिता केंद्रीय वन व पर्यावरण विभागाचे नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त करण्यास सुचविले होते.

सदर प्रस्ताव महाराष्ट्र सागरी किनारा व्यवस्थापन प्राधिकरणाच्या दि. २० डिसेंबर, २०१८ रोजी झालेल्या १२८ व्या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार केंद्रीय पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांना दि. १४ फेब्रुवारी, २०१९ रोजीच्या पत्रान्वये शिफारस करुन पाठविण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वासिंद (जि.ठाणे) येथील जेएसडब्ल्यू स्टील लिमिटेड कंपनीच्या मनमानी कारभाराबाबत**

**(३५) ११८०६२ (२३-०७-२०१८). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वासिंद (जि.ठाणे) येथील जेएसडब्ल्यू स्टील लिमिटेड कंपनीच्या मनमानी कारभाराबाबत सचिव, पर्यावरण विभाग यांना स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ७ मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (१६-०३-२०१९) :** (१) व (२) मे. जेएसडब्ल्यू स्टील कोटेड प्रॉडक्टस लिमिटेड, ता. शहापूर, जि. ठाणे या कारखान्यास महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने Cold Rolled Strips/Zinc Coils] Sheet Coated Products & intermediate CRCA -२७५०० MT/M] Power generation (Cold Rolled activities) ६५०० Unit/h, Hot Rolled Coils/Plates -१५००० MT/M चे उत्पादन घेण्याकरिता अटी व शर्तीयुक्त संमतीपत्र प्रदान केले आहे. मे. जेएसडब्ल्यू स्टील कोटेड प्रॉडक्टस लिमिटेड या कारखान्यांच्या दि. १७/०४/२०१८ रोजीच्या महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिलेल्या भेटीदरम्यान कारखान्यातून कोणत्याही प्रकारचे सांडपाणी आवाराबाहेर जात असल्याचे आढळून आलेले नाही. तसेच कारखान्यामधील पिकलिंग व ऐआरपी सेक्शन बंद असून त्याचे नुतनीकरणाचे काम चालु असल्याचे आढळून आले आहे. कारखान्यातील घरगुती सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याकिरता सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा बसविण्यात आली असून भेटीदरम्यान ती चालु असल्याचे व प्रक्रियाकृत सांडपाण्याचा वापर कारखान्यांच्या आवारामध्ये बागबगिचा करता करण्यात येत असल्याचे आढळून आले आहे. नवीन एसटीपीचे बांधकाम चालु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भोर मधील बायो मेडिकल वेस्ट प्रकल्प डॉ.जगताप हॉस्पिटल प्रा.लि.**
**(धनगरवाडी, जि.सातारा) यांना देण्याबाबत**

**(३६) ११९१४६ (२३-०७-२०१८). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धनगरवाडी (ता.खंडाळा, जि.सातारा) येथील डॉ.जगताप हॉस्पिटल प्रा.लि. हा प्रकल्प दिनांक १५ एप्रिल, २०१७ पासून बंद करण्याचा आदेश शासनाने दिला असल्याने सदर प्रकल्प भोर व वेल्हे (जि.पुणे) तालुक्यातील वेस्ट जय भवानी बायो मेडिकल केअर प्रकल्प, बारामती यांना देण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डॉ.जगताप हॉस्पिटल प्रा.लि., धनगरवाडी यांच्या प्रकल्पामध्ये असलेल्या तांत्रिक त्रूटींची पूर्तता करुन पुन्हा डॉ.जगताप हॉस्पिटल प्रा.लि., धनगरवाडी यांनाच सदर प्रकल्प देण्याची परवानगी मिळणेबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी प्रादेशिक अधिकारी, पुणे विभाग तसेच मा.पर्यावरण मंत्री यांच्याकडे माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (२२-०२-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) निवेदन प्राप्त नाही. तथापि उप प्रादेशिक कार्यालय सातारा यांनी दिनांक २६.०२.२०१८ रोजी डॉ. जगताप यांच्या वाई येथे असलेल्या मे. साई दत्त हॉस्पिटल, वाई या हॉस्पिटलला दिलेल्या पत्राच्या अनुषंगाने दिनांक ०१.०३.२०१८ च्या पत्रान्वये देण्यात आलेल्या उत्तरात प्रामुख्याने डॉ.जगताप हॉस्पिटल प्रा.लि, धनगरवाडी या प्रकल्पाबाबतचा उल्लेख करण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई-गोवा महामार्गावर नियमबाह्यरित्या रासायनिक घन कचऱ्याची वाहतूक होत असल्याबाबत**

**(३७) १२०५७० (२३-०७-२०१८). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई-गोवा महामार्गावरून खेड, चिपळूण व महाड या औद्योगिक क्षेत्रातील ओला घनकचरा वाहतूक करताना महाराष्ट्र प्रदूषण मंडळाचे आणि वाहतूक विभागाचे पालन न करता वाहतूक केली जाते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर औद्योगिक क्षेत्रातील रासायनिक ओला घनकचरा वाहतूक करणाऱ्या कंपन्यांच्या वाहनांवर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे कोणतेच नियंत्रण नसल्याने कचरा आणि पाणी रस्त्यावर पडून उडत असल्याने दुचाकीस्वारांसह प्रवाशांना याचा त्रास सहन करावा लागतो, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, औद्योगिक क्षेत्रातील रासायनिक घनकचरा हा संबंधित कंपन्यांनी कंपनीच्या आवारात वाळवून मगच मुंबई वेस्ट मॅनेजमेंट सारख्या प्रकल्पांना नष्ट करण्यासाठी देणे आवश्यक असताना कचरा रस्त्याच्या कडेला व नदीत टाकून देण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी संबंधीत दोषी कंपन्या व वाहतूक करणाऱ्यांवर शासनाकडून कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (२२-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही.
(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भिवंडी तालुक्यात सीआरझेड कायद्याचे उल्लंघन होत असल्याबाबत**

**(३८) १२११५९ (२३-०७-२०१८). श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी तालुक्यात खाडी लगत असलेल्या भागात सीआरझेड कायद्याच्या नियमांचे उल्लंघन करुन कांदळवनाची तोड करुन गोडावून व बांधकामे होत असल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.पर्यावरणमंत्री व अप्पर मुख्य सचिव, पर्यावरण यांना दिनांक २४ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निवेदन देऊन कारवाई करण्याची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनानुसार शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. रामदास कदम (०८-०३-२०१९) :** (१) होय.

(२) सदर सी. आर. झेड. उल्लंघनाबाबत तहसिलदार, भिवंडी यांनी सन २००८ ते २०१७ पर्यंत ३० जणांवर गुन्हे दाखल केले आहेत. तसेच मौजे काल्हेर येथील सरकारी जागेवरील १० बांधकामे अंशत: व १८ बांधकामे पुर्णत: दि. १९/०१/२०१८ रोजी निष्कासित केली आहेत.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने भिवंडी तालुक्यातील एम.एम.आर.डी.ए. अधिसुचित ६० गांवामधील ५५१ उद्योगांना जून, २०१८ मध्ये कारणे दाखवा नोटीस बजावली आहे व पुढील कार्यवाही सुरु आहे.

खाडी लगतची भिवंडी तालुक्यातील गावे ही मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचे क्षेत्रात येत असल्याने या ठिकाणी बांधकाम परवाना देणे, नकाशा मंजूर करणे तसेच अनधिकृत बांधकामावर एम.आर.टी.पी. ॲक्ट १९६६ चे कलम ५१ वे ५४ नुसार संबंधितावर गुन्हा दाखल करणे या बाबी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाशी संबंधीत आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रायगड किल्ल्यासह राज्यातील इतर महत्वाच्या किल्ल्यांचा सर्वांगिण विकास करण्याबाबत**

**(३९) १२२४८४ (२०-०७-२०१८). श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड किल्ल्याच्या सर्वांगिण विकासासाठी राज्यशासनाने ६०६ कोटी रुपयांचा विकास आराखडा तयार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भारतीय पुरातत्व विभागाकडून या किल्ल्याच्या विकासासाठी आवश्यक असणाऱ्या परवानग्या घेण्यात आल्या आहेत काय,

(३) असल्यास, रायगड किल्ल्यांचा सर्वांगिण विकास किती दिवसात पुर्ण करण्यात येणार आहे तसेच राज्यातील इतर महत्वांच्या किल्ल्याच्या सर्वांगिण विकासासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२१-०२-२०१९) :** (१) हे खरे आहे.

दिनांक ३१ मार्च, २०१७ च्या शासन निर्णयान्वये रायगड किल्ला व परिसर विकास आराखड्यास मंजूरी देण्यात आली आहे.

(२) होय.

(३) रायगड किल्ल्याचा विकास पुरातत्वीय संकेतानुसार करण्यात येणार असून निश्चित कालावधी नमूद करता येत नाही. तसेच गड संवर्धन समितीच्या शिफारशीनुसार राज्यातील २८ किल्ल्यांच्या संवर्धनाचे काम या शासनाने हाती घेतले आहे. त्यापैकी ८ किल्ल्यांची हाती घेतलेली कामे पूर्ण झाली असून इतर किल्ल्यांच्या संवर्धनाचे काम प्रगतीपथावर आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ठाणे आणि पालघर जिल्ह्यांतील मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेनच्या प्रकल्पाचा पर्यावरणीय परिणाम मसुदा उपलब्ध होण्याबाबत

**(४०) १२३०४५ (२३-०७-२०१८). श्री.राज पुरोहित (कुलाबा) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे आणि पालघर जिल्ह्यांत मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेनच्या प्रकल्पाचा पर्यावरणीय परिणाम मसुदा सहजगत्या उपलब्ध होत नसल्याने नागरिक आणि पर्यावरण संस्थांमध्ये संभ्रम निर्माण झाल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पर्यावरणीय परिणाम मसुदा अद्याप नागरिकांना उपलब्ध न होण्याची कारणे काय आहेत, सदर मसुदा नागरिक आणि पर्यावरण संस्थाना उपलब्ध करून देऊन त्यांच्यातील संभ्रम दूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (०८-०३-२०१९) :** (१) व (२) मुंबई-अहमदाबाद हा हायस्पीड रेल्वे प्रकल्प मे.राष्ट्रीय हायस्पीड रेल निगम लि. यांचेतर्फे राबविणे प्रस्तावित आहे. या प्रकल्पाकरीता जिल्हाधिकारी, ठाणे व पालघर यांनी अनुक्रमे दि.२९.०५.२०१८ रोजी ठाणे व दि.०२.०६.२०१८ रोजी पालघर येथे पर्यावरण विषयक सुनावणी आयोजित केली होती. सदर जनसुनावणीच्यावेळी पर्यावरण परिणाम प्रारुप संक्षिप्त अहवाल नॅशनल हाय स्पीड रेल कॉर्पोरेशन लिमिटेड यांनी उपलब्ध केला होता. सदरचा अहवाल मा. जिल्हाधिकारी यांच्या निर्देशानुसार https://www.nhsrcl.in/feasibility_files/EI_CR१५१३७_Vol-५.pdf (Volume५ Appendix ४) या संकेतस्थळावर वर उपलब्ध आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**देगलूर-बिलोली (जि.नांदेड) तालुक्यातील नळपाणी पुरवठा योजना कार्यान्वित करण्याबाबत**

**(४१) १२४५३१ (२३-०७-२०१८). श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देगलूर-बिलोली (जि.नांदेड) तालुक्यातील नळपाणी पुरवठा योजना कार्यान्वित करण्यासाठी लोकप्रतिनिधी, देगलूर-बिलोली यांनी मा.पाणी पुरवठा मंत्री यांच्याकडे माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने सदरहू पाणी पुरवठा योजना कार्यन्वित करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१४-०३-२०१९) :** (१) हे खरे नाही.

(२) देगलूर-बिलोली तालुक्यातील विविध योजनेतून हाती घेण्यात आलेल्या नळ योजनांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| **तालुका** | **राष्ट्रीय पेयजल कार्यक्रमात हाती घेतलेल्या नळ योजना** | **कार्यान्वीत केलेल्या नळ योजना** | **प्रगतीपथावर असणाऱ्या नळ योजना** |
|---|---|---|---|
| | **एकूण योजना** | | |
| देगलूर | ४७ | ४२ | ०५ |
| बिलोली | २९ | २३ | ०६ |

सन २०१८-१९ च्या आराखड्यात नवीन प्रस्तावित आराखड्यात देगलुर तालुक्यातील १४ योजनांचा व बिलोली तालुक्यातील ०४ योजनांचा समावेश आहे.

या शिवाय लोकप्रतिनिधी यांच्या दिनांक २०/८/२०१८ व दि.१८/०९/२०१८ च्या निवेदनानुसार NRDWP च्या सन २०१९-२० च्या पुरवणी आराखड्यात देगलुर तालुक्यातील ३४ व बिलोली तालुक्यातील ३१ गावांचा समावेश करण्याबाबत प्रस्तावित करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात अवैधरित्या गुटखा विक्री होत असल्याबाबत**

**(४२) १२५९०९ (२०-०७-२०१८). ॲड.वारीस पठाण (भायखळा) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गुटखा विक्रीस बंदी असतांनाही नियमबाह्यरित्या गुटख्याची विक्री व उत्पादन केले जात असणे, गुजरातसह परराज्यातून गुटखा आणला जात असणे तसेच गुटख्याची गाडी सोडली नाही म्हणून लोकप्रतिनिधींनी माहे जून, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान गंगापूर पोलीस ठाण्यातील पोलीस उपनिरीक्षक यांना धमकाविले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धमकी देऊन सोडवण्यात आलेल्या गुटखा गाडीच्या मालकाच्या आणखी किती गाड्या आहेत तसेच पोलिसांना धमकी दिल्याबाबत शासनाने सबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, तामिळनाडू राज्याप्रमाणे गुटख्याबाबत राज्यात ईडीच्या मदतीने छापे टाकून सीबीआय मार्फत कारवाई करण्यात येणार आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (२८-०२-२०१९) :** (१) व (२) राज्यात गुटख्याची खुले आम विक्री होत नसून चोरट्या व छुप्या मार्गाने होत असल्याचे अन्न व औषध प्रशासनाने घेतलेल्या कार्यवाही वरुन आढळून आले आहे.

तथापि, गुटख्याची गाडी सोडली नाही म्हणून लोकप्रतिनिधींनी माहे जून, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान गंगापूर पोलीस ठाण्यातील पोलीस उपनिरीक्षक यांना धमकाविले हे खरे नाही.

(३) सदर बाब केंद्र शासनाच्या अखत्यारीतील आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मेहकर (जि.बुलढाणा) शहरातील कंचणीचा महाल व इतर ऐतिहासिक वास्तुंची दुरुस्ती करण्याबाबत**

**(४३) १२८३५० (२९-१२-२०१८). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेहकर (जि.बुलढाणा) शहरातील कंचणीचा महाल व इतर अनेक ऐतिहासिक वास्तू असून या वास्तूंकडे भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाचे दुर्लक्ष होत असल्याने त्या इतिहासजमा होण्याच्या मार्गावर असल्याचे माहे जुलै, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अशा किती वास्तूंची पाहणी करण्यात आली आहे,
(३) असल्यास, या ऐतिहासिक वास्तूंची दुरुस्ती करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. विनोद तावडे (०८-०३-२०१९) :** (१) व (२) अशी बाब निदर्शनास आली नाही.

कंचनीचा महाल हे राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित करण्याबाबतची प्राथमिक अधिसूचना जुलै, २०१६ मध्ये प्रसिद्ध झाली असून अंतिम अधिसूचनेचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. सहायक संचालक, पुरातत्व विभाग, नागपूर विभाग यांच्याद्वारे मेहकर शहरात स्थित बालाजी मंदिर व मोमीन दरवाजा या स्मारकाची पाहणी करण्यात आली आहे. सद्यस्थितीत बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेडराजा स्थित लखुजीराव जाधव राजवाडा, मोती तलाव, रंगमहाल, सावकारवाडा या स्मारकांची विस्तृत पाहणी करून राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित करण्यात आले आहे. तसेच काळाकोट हे स्मारक राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित करण्याची कार्यवाही पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालयामार्फत सुरू आहे.

(३) बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेडराजा स्थित लखुजीराव जाधव राजवाडा, निळकंठेश्वर मंदिर, सावकारवाडा, रंगमहाल व काळाकोट या स्मारकांच्या जतन दुरूस्तीच्या कामास शासनाने मंजूरी दिली असून जतन कार्यास सुरूवात झाली आहे.

---

**डोंबिवली पश्चिम येथील शिधावाटप कार्यालय जुन्या पडक्या धोकादायक जागेत हलविण्यात आल्याबाबत**

**(४४) १२९७०३ (२९-१२-२०१८). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंबिवली पश्चिम येथील शिधावाटप कार्यालय दिनांक २६ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास विष्णूनगर पोलीस ठाण्याच्या जुन्या, पडक्या व धोकादायक इमारतीत हलविण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या पडक्या, जुन्या व धोकादायक इमारतीत शिधावाटप कार्यालय सुरु झाल्याने कार्यालयातील कर्मचारी व नागरीकांमध्ये भितीचे वातावरण पसरले असून त्यांना जीव मुठीत धरुन काम करावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अशा असुरक्षित इमारतीत शिधावाटप कार्यालय सुरु करण्याची कारणे काय आहेत तसेच सदर कार्यालय सुरक्षित जागी हलविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (२५-०२-२०१९) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

शासन मंजूरीनुसार व नवीन जागेचे दुरुस्तीकाम पुर्ण झाल्यानंतर शिधावाटप कार्यालय क्र.३९ मुख्य जुने विष्णुनगर, डोंबिवली पोलीस स्टेशन, महात्मा गांधी रोड, स्टेशन परिसर डोंबिवली (पश्चिम) या नवीन जागेत दि.०७.०१.२०१९रोजी स्थलांतरीत झालेले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कळमनुरी (जि. हिंगोली) तालुक्यात शौचालय बांधलेल्या लाभार्थ्यांचे पैसे थकित असल्याबाबत**

**(४५) १३०३६२ (२९-१२-२०१८). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळमनुरी (जि.हिंगोली) तालुक्यात उसनवारीने पैसे घेवून बांधण्यात आलेल्या लाभार्थ्यांच्या शौचालयाचे चार कोटी रुपये थकविण्यात आल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शौचालयाचे थकीत चार कोटी रुपये लवकरात लवकर लाभार्थ्यांना देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२६-०२-२०१९) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) व (३) एप्रिल,२०१८ मध्ये संपूर्ण महाराष्ट्र हागणदारीमुक्त घोषित करण्यात आले आहे. त्याआधी सन २०१७-१८ वर्षामध्ये हिंगोली जिल्हयातील कळमनुरी तालुक्यात एकूण १८०९४ एवढे वैयक्तिक शौचालय बांधकाम करुन घेण्यात आले आहे. त्यासाठी रु.४,८७,२८,७७१/- रुपये निधी जिल्हास्तरावरुन वितरीत करण्यात आलेला आहे. त्यापैकी रु.२,७४,४४,०००/- एवढा निधी ११८७१ लाभार्थ्यांना शौचालयाचे प्रोत्साहनपर अनुदान थेट खात्यावर वर्ग करण्यात आले व ११६५ लाभार्थ्यांना शौचालयाचे प्रोत्साहनपर अनुदान ग्रामपंचायत मार्फत असे एकूण १३०३६ लाभार्थ्यांना अनुदान वाटप करण्यात आले आहे. उर्वरीत ५०५८ लाभार्थ्यांना खात्यावर प्रोत्साहनपर अनुदान वाटपाची प्रक्रिया पंचायत समिती कळमनुरी स्तरावरुन सुरु आहे.

---

### मुंबईतील जुहू समुद्रकिनाऱ्यावर तेलाच्या गुठळ्या निमार्ण होऊन प्रदुषण झाल्याबाबत

**(४६) १३०६२३ (२९-१२-२०१८). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईच्या समुद्रात वावरणाऱ्या जहाजातून सोडण्यात येणाऱ्या तेलामुळे जुहू येथील चार ते पाच किलोमीटरचा किनारा प्रदुषित झाला असल्याचे दिनांक २१ जुलै, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भरतीच्या काळात काळ्या गुठळ्या किनाऱ्यावर येत असून गुठळ्यावरून चालल्यास पायाला उग्र वास येणे, कपड्यांवर डाग पडणे तसेच समुद्र किनारा अस्वच्छ होत असून प्रदूषणात वाढ होत असल्याचे मत तज्ञांनी व्यक्त केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (०८-०३-२०१९) :** (१) व (२) हे अंशतः खरे आहे.
भारतीय तटरक्षक दलातर्फे जहाज व हवाईमार्गे समुद्राची नियमीतपणे पाहणी केली जाते. नजिकच्या व संबधीत काळात तेलगळती, तेलाचा तवंग समुद्रात पसरण्याची घटना झाल्याचे निदर्शनास आली नसल्याचे तटरक्षक दलाकडून कळविण्यात आले आहे. भारतीय

तटरक्षक दलाने ऑईल ॲन्ड नॅचरल गॅस कंपनीशी त्यांच्या समुद्रात असलेल्या तेल विहीर प्रकल्पातून संबधीत काळात तेल गळती झाली नसल्याचे खात्री केली आहे. तथापि, १५ ऑगस्ट २०१८ व १६ ऑगस्ट २०१८ च्या पाहणी दरम्यान जुहू समुद्र किना-यावर काही प्रमाणात तेलाच्या गुठळया जमा झाल्याचे निदर्शनास आले होते.

(३) महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून समुद्राच्या पाण्याचे नमुने संकलित करण्यात आले होते व सदरील पाण्यामध्ये आईल व ग्रीसचे प्रमाण विहीत मर्यादेत आढळून आले आहे. त्याचबरोबर, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने व राष्ट्रीय समुद्र विज्ञान संस्थान मुंबई यांनी संयुक्तपणे सदर परिसराची पाहणी करून तेलांच्या गुठळयाचे नमुने पृथ्थ:करणासाठी राष्ट्रीय समुद्र विज्ञान संस्थानाने गोळा केले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**गेवराई (जि.बीड) येथील राष्ट्रीय पेयजल योजनेत भ्रष्टाचार करणारे अधिकारी व पाणी पुरवठा समिती यांच्यावर कारवाई करणेबाबत**

**(४७) १३०८३७ (२९-१२-२०१८). श्री.लक्ष्मण पवार (गेवराई) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गेवराई (जि.बीड) येथील राष्ट्रीय पेयजल योजनेत झालेल्या भ्रष्टाचारास जबाबदार असणारे अधिकारी व पाणी पुरवठा समिती यांच्यावर कारवाई करणेबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी (गेवराई) यांनी मा.पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री यांना दिनांक ११ जुलै, २०१८ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी केलेल्या चौकशीत एकुण २५ गावातील समित्यांनी निधीचा गैरवापर केला असल्याने १० ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समितीच्या पदाधिका-यांवर फौजदारी गुन्हे व १५ समितीच्या पदधिका-यांच्या स्थावर मालमत्तेवर आर्थिक बोजा टाकण्याची शिफारस जिल्हाधिकारी यांचेकडे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त शिफारशीनुसार शासनाने कारवाई केली आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२५-०२-२०१९) :** (१) होय. हे खरे आहे.

(२) होय. हे खरे आहे.

(३) यात २९ गावांतील समित्यांवर कार्यवाही करण्यात आली आहे. ती खालीलप्रमाणे

- १० ग्रामीण पाणी पुरवठा स्वच्छता समितीचे अध्यक्ष व सचिव यांचेवर खात्यामार्फत फौजदारी गुन्हे नोंद करण्यात आले आहेत.
- मुख्य कार्यकारी अधिकारी, बीड यांनी २६ मार्च, २०१७ च्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, बीड यांना एकूण १९ पाणी पुरवठा समित्यांवर बोजा टाकण्याची शिफारस केली असून तहसिलदार, गेवराई यांच्या दिनांक ७/६/२०१८ चे पत्रानुसार एकूण ८ पाणी पुरवठा समित्यांवर बोजा टाकण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर जिल्हा परिषद ग्रामीण पुरवठा विभागाची वाहन निविदा प्रक्रिया प्रलंबित असल्याबाबत

**(४८) १३११२९ (१०-१२-२०१८). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हा परिषद ग्रामीण पुरवठा विभागाची वाहन निविदा प्रक्रिया माहिन्यापासुन प्रलंबित असल्याचे माहे ऑगस्ट मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विशिष्ट व्यक्तीला फायदा देण्याकरिता ही निविदा प्रक्रिया मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांनी प्रलंबित ठेवली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार निविदा प्रलंबित ठेवणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१२-०३-२०१९) :** (१) नाही.

(२) नाही.

(३) नागपूर जिल्हा परिषद अंतर्गत ग्रामीण पाणी पुरवठा विभागाच्या कामासाठी भाडे तत्वावर एक कार व ९ जीप अशी एकूण १० वाहनांकरिता दि. २२.०१.२०१८ रोजी ई-निविदा प्रकाशित करण्यात आली होती. सदर ई निविदेचा तांत्रिक लिफाफा दि. १७.०२.२०१८ रोजी उघडण्यात आला. एकूण ५ पात्र निविदाधारकांपैकी कमी दर असलेल्या दोन निविदा स्वीकारण्यात आल्या. मात्र जीप पुरविण्याकरिता निवड झालेल्या प्रकारातील निविदाधारकाने एकच वाहन पुरविण्याचे मान्य केले. त्यामुळे उर्वरित आठ जीप वाहने L-१ च्याच दरात L-२ कडून वाटाघाटी करुन पुरविण्याबाबतीत त्यांची सहमती मिळवण्यात आली. त्यामुळे या प्रकरणात निविदा प्रलंबित ठेवण्यात आल्याची घटना घडल्याचे दिसून येत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मे.क्षितीज इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. ताडदेव, मुंबई यांनी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या अटी व शर्तीचे उल्लंघन केल्याबाबत

**(४९) १३२०३४ (२९-१२-२०१८). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मे.क्षितीज इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. ताडदेव, मुंबई यांनी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या अटी व शर्तीचे उल्लंघन केल्याप्रकरणी नोटीस बजावण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मे.क्षितीज इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. ताडदेव, मुंबई यांचेविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (०५-०३-२०१९) :** (१) व (२) हे खरे आहे,

मे.क्षितीज इन्फ्ररस्ट्रक्चर प्रा.लि. ताडदेव, मुंबई यांनी विस्तारीत प्रकल्पाच्या समतीपत्रासाठी अर्ज केलेला होता. सदरील अर्जावर संमतीपत्र समितीच्या दिनांक १२ फेब्रुवारी, २०१८ बैठकीमध्ये चर्चा होऊन प्रकल्प प्रर्वतकाने संमतीपत्रासाठी मा.उच्च न्यायालय यांचे दिनांक २६ व २९ फेब्रुवारी, २०१८ च्या आदेशानंतर अर्ज केल्यामुळे संमतीपत्र अर्ज नाकारण्यासाठी व प्रकल्पाचे काम बंद करण्यासंबंधी दिनांक २६ मार्च, २०१८ रोजी कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिलेल्या कारणे दाखवा नोटीसी संदर्भात प्रकल्प प्रर्वतकाने दिनांक ०७ एप्रिल, २०१८ च्या पत्राने उत्तर सादर केले असून संमतीपत्र अर्ज संमतीपत्र समितीकडे पुढील कार्यवाहीसाठी सादर केलेला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील सी.आर.झेड.बाधीत क्षेत्रामध्ये सार्वजनिक अथवा व्यक्तीगत शौचालयाच्या बांधकामाबाबत

**(५०) १३२०९६ (२९-१२-२०१८). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सी.आर.झेड. बाधीत क्षेत्रामध्ये सार्वजनिक अथवा व्यक्तीगत शौचालयाचे बांधकाम करावयाचे असल्यास सी.आर.झेड. कमिटी, महाराष्ट्र राज्य यांची परवानगी घेणे आवश्यक आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्वच्छ भारत अभियानांतर्गत सी.आर.झेड. बाधीत नगरपरिषदेच्या स्वत:च्या अथवा शासकीय जागेत सार्वजनिक शौचालय बांधावयाचे असल्यास कोणकोणत्या विभागाची परवानगी घेणे आवश्यक आहे,

(३) तसेच हागणदारी मुक्त शहरांसाठी सी.आर.झेड. बाधीत क्षेत्रात नगरपरिषदेस सार्वजनिक व व्यक्तीगत शौचालय बांधण्यासाठी कोणत्या विशेष सवलती देण्यात आल्या आहेत,

(४) नसल्यास, सी.आर.झेड. बाधीत क्षेत्रात सार्वजनिक व व्यक्तीगत शौचालय बांधण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. रामदास कदम (०५-०३-२०१९) :** (१) हे खरे नाही.

(२) ते (४) महाराष्ट्र सागरी किनारा व्यवस्थापनाच्या दि. १९/१२/२०१५ रोजीच्या बैठकीतील निर्णयानुसार, सिआरझेड क्षेत्रात येणा-या सार्वजनिक शौचालयाच्या बांधकामांना सिआरझेड परवानगीची आवश्यकता नाही. तथापि, भरती व ओहोटी मधील क्षेत्रामध्ये शौचालय बांधकाम अनुज्ञेय नाही.

---

**विधान भवन :** **जितेंद्र भोळे**
**मुंबई.** **सचिव (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.